सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, २० जानेवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक २९६ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# 'कुंभ' हा एकतेचा महाकुंभ : पंतप्रधान मोदी

नवी दिल्ली, १९ जानेवारी : सध्या उत्तर प्रदेशात महाकुंभमेळा सुरू आहे. हा एक अविस्मरणीय गर्दी, एक मनोहारी दृश्य आणि समानता आणि सौहार्दाचा एक अनन्यसाधारण संगम आहे. कुंभाचा हा उत्सव विविधतेत एकतेचा उत्सव आहे. संगमाच्या वाळूवर भारतासह जगभरातून लोक जमतात. हजारो वर्षांपासून चालत आलेल्या या परंपरेत कुठेही भेदभाव किंवा जातीयवाद नाही. कुंभमेळ्यात, श्रीमंत आणि गरीब हा भेदभाव उरत नाही. सर्वजण संगमात डुबकी मारतात, भंडाऱ्यात एकत्र जेवतात, प्रसाद घेतात - म्हणूनच 'कुंभ' हा एकतेचा महाकुंभ आहे. आपल्या परंपरा संपूर्ण भारताला कशा एका सूत्रात बांधतात हे देखील कुंभमेळ्याचा उत्सव आपल्याला सांगतो, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. 'मन की बात'च्या (११८ वा भाग) कार्यक्रमातून त्यांनी देशवासियांशी संवाद साधला.

मोदी पुढे म्हणाले की, उत्तरेपासून दक्षिणेकडे श्रद्धांचे पालन करण्याचे मार्ग सारखेच आहेत. एकीकडे प्रयागराज, उज्जैन, नाशिक आणि हरिद्वार येथे कुंभाचे आयोजन केले जाते, तर त्याचप्रमाणे दक्षिण भागात गोदावरी, कृष्णा, नर्मदा आणि कावेरी नद्यांच्या काठावर पुष्करमचे आयोजन केले जाते. हे दोन्ही उत्सव आपल्या पवित्र नद्या आणि त्यांच्याप्रति असलेल्या श्रद्धेशी निगडित आहेत. त्याचप्रमाणे, कुंभकोणमपासून तिरुक्कड-युरपर्यंत, कुडा-वासलपासून तिरुचेरईपर्यंत, अशी अनेक मंदिरे आहेत ज्यांच्या परंपरा कुंभमेळ्याशी संबंधित आहेत. कुंभमेळ्यात तरुणांचा सहभाग खूप व्यापक प्रमाणात दिसून येतोय आणि हे देखील खरे आहे की, जेव्हा तरुण पिढी आपल्या संस्कृतीशी अभिमानाने जोडली जाते, तेव्हा तिची मुळे आणखी मजबूत होतात आणि मग तिचे उज्ज्वल भविष्य देखील सुनिश्चित होते. यावेळी आपण कुंभमेळ्यातील डिजिटल पदरव (पाऊले) इतक्या मोठ्या प्रमाणात अनुभवत आहोत. कुंभमेळ्याची ही जागतिक लोकप्रियता प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाची गोष्ट आहे.

यावेळीचा 'प्रजासत्ताक दिन' खूप खास आहे. भारतीय प्रजासत्ताकाचा हा ७५वा वर्धापन दिन आहे. या वर्षी संविधानाच्या अंमलबजावणीला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. आपल्याला आपले पवित्र संविधान देणाऱ्या संविधान सभेतील सर्व महान व्यक्तींना मी वंदन करतो. संविधान सभेदरम्यान, विविध विषयांवर बरेच विचारमंथन झाले. त्या चर्चा, संविधान सभेतील सदस्यांचे विचार, त्यांचे ते शब्द, हा आपला सर्वात मोठा वारसा आहे.

प्रजासत्ताक दिनाच्या आदल्या दिवशी म्हणजे २५ जानेवारी रोजी 'राष्ट्रीय मतदार दिन' आहे. हा दिवस महत्त्वाचा आहे कारण या दिवशी 'इलेक्शन कमिशन' म्हणजे भारतीय निवडणूक आयोगाची स्थापना झाली होती. आपल्या संविधान कर्त्यांनी संविधानामध्ये आपल्या निवडणूक आयोगाला आणि लोकशाहीमध्ये लोकांच्या सहभागाला खूप महत्त्वाचे स्थान दिले आहे. १९५१-५२ मध्ये जेव्हा देशात पहिल्यांदा निवडणुका झाल्या, तेव्हा देशातली लोकशाही टिकेल की नाही अशी काहींना शंका होती; पण, आपल्या लोकशाहीने सर्व किंतु परंतु फोल ठरवले - शेवटी, भारत ही लोकशाहीची जननी आहे. गेल्या दशकांमध्ये देखील, देशाची लोकशाही मजबूत आणि समृद्ध झाली आहे. वेळोवेळी आपल्या मतदान प्रक्रियेचे आधुनिकीकरण आणि बळकटीकरण करणाऱ्या निवडणूक आयोगाचे सुद्धा मी आभार मानतो. आयोगाने तंत्रज्ञानाच्या शक्तीचा वापर करून लोकांच्या शक्तीला आणखी बळकटी दिली. निष्पक्ष निवडणुकांसाठीच्या वचनबद्धतेबद्दल मी निवडणूक आयोगाचे अभिनंदन करतो. मी देशवासियांना आवाहन करतो की, त्यांनी जास्तीत जास्त संख्येने मतदानाचा अधिकार बजावावा, नेहमी बजावावा, आणि देशाच्या लोकशाही प्रक्रियेचा भाग बनून ही प्रक्रिया बळकटही करावी.

# खेलरत्न विजेत्या मनू भाकरच्या आनंदावर विरजण; नातलगांचा अपघाती मृत्यू!

नवी दिल्ली : भारताची स्टार नेमबाज मनू भाकरवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मनू भाकरचे मामा आणि आजीचा रस्ते अपघातात मृत्यू झाला आहे. हरियाणातील महेंद्रगडच्या बायपास रोडवर हा अपघात घडला. मनू भाकरचे मामा आणि आजी हे दोघेही स्कूटीवरुन जात असताना अचानक एका गाडीने त्यांना धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती त्या दोघांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर कार चालक फरार झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मनू भाकरचे मामा युद्धवीर सिंग हे रोडवेजमध्ये ड्रायव्हर म्हणून नोकरी करत होते. त्यांचे महेंद्रगड बायपासवर घर आहे. ते आज नेहमीप्रमाणे सकाळी कामासाठी घराबाहेर पडले. त्याच वेळी



मनूची आजी सावित्री देवी यांना त्यांच्या लहान मुलाच्या घरी लोहारु चौकात जायचे होते. त्यामुळे युद्धवीर यांनी त्यांच्या आईला दुचाकीवर बसण्यास सांगितले आणि ते एकत्र निघाले. मनू भाकरचे मामा हे दुचाकी चालवत कालियाना वळणाजवळ आले. त्याचवेळी समोरुन भरधाव वेगात कार येताना दिसली. हा कार उलट दिशेने येत होती आणि तिचा वेग प्रचंड होता. यावेळी कार चालकाचे नियंत्रण सुटले. त्यानतंर ती कार थेट मनू भाकर यांच्या दुचाकीला जाऊन आदळली.

यावेळी युद्धवीर सिंग आणि सावित्री देवी हे रस्त्यावर पडून जखमी झाले. तर भरधाव वेगात येणारी कार ही रस्त्याच्या कडेला उलटी झाली. ही धडक इतकी भीषण होती की, दोघांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर कार चालकाने घटनास्थळावरून पळ काढला. पोलिसांना या घटनेची माहिती मिळताच त्यांनी ताताडीने घटनास्थळी धाव घेतली. यानंतर पोलिसांनी मनू भाकरचे मामा आणि आजीचे मृतदेह पोस्टमार्टमसाठी पाठवले आहेत. तसेच सध्या पोलीस या घटनेची चौकशी करत असून आरोपींचा शोध घेत आहे.

# आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या क्रिकेटपटू विरोधात अटक वॉरंट

ढाका : आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या क्रिकेटपटू विरोधात अटक वॉरंट निघाले आहे. बांग्लादेश क्रिकेट संघातील प्रमुख खेळाडू असलेल्या शाकिब अल हसन विरोधात अटक वॉरंट निघाले आहे.

चेक बाऊन्स झाल्यामुळे बँकिंग क्षेत्राशी संबंधित नियमांतर्गत शाकिब अल हसन विरोधात अटक वॉरंट निघाले आहे. न्यायालयाने शाकिब अल हसन विरोधात अटक वॉरंट काढले आहे. क्रिकेटमध्ये उत्तम कारकिर्द असलेल्या शाकिब अल हसनचे वैयक्तिक आयुष्यातले वर्तन अनेकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. ताज्या चेक बाऊन्स प्रकरणामुळे शाकिब अल हसन अडचणीत सापडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

बांगलादेशच्या शाकिब अल हसनने ७१ कसोटी सामन्यात ४,६०९ धावा केल्या आहेत. त्याने कसोटी क्रिकेटमध्ये पाच शतके आणि ३१ अर्धशतके झळकावली आहेत. कसोटीत एका डावात फलंदाजी करताना शाकीबने २१७ धावा ही वैयक्तिक सर्वात मोठी धावसंख्या उभारली आहे. त्याने एकदिवसीय क्रिकेटमध्ये २४७ सामने खेळत ७,५७० धावा केल्या आहेत. यात त्याने केलेल्या नऊ शतकांचा आणि ५६ अर्धशतकांचा समावेश आहे. एकदिवसीय क्रिकेटमध्ये नाबाद १३४ धावा ही शाकीबची सर्वोत्तम वैयक्तिक धावसंख्या आहे. शाकीबने १२९ आंतरराष्ट्रीय टी - ट्वेंटी सामने खेळून २५५१ धावा केल्या आहेत. त्याने टी - ट्वेंटीमध्ये १३ अर्धशतके झळकावली आहेत.

शाकीबने कसोटी क्रिकेटमध्ये २४६, एकदिवसीय क्रिकेटमध्ये ३१७ आणि टी - ट्वेंटीमध्ये १४९ बळी घेतले आहेत. कसोटी क्रिकेटमध्ये शाकीबने १९ वेळा एका डावात पाच बळी घेण्याची किमया केली आहे. त्याने एकदिवसीय क्रिकेटमध्ये चार वेळा आणि टी - ट्वेंटीमध्ये दोन वेळा एका डावात पाच बळी घेण्याची किमया केली आहे. शाकीबने दोन आंतरराष्ट्रीय कसोटी सामन्यात दहा बळी घेण्याची किमया साधली आहे.

# महाकुंभात सिलेंडर स्फोटामुळे लागलेली आग नियंत्रणात

प्रयागराज (उत्तर प्रदेश) : महाकुंभमेळ्यात सिलेंडर स्फोटामुळे लागलेली आग नियंत्रणात आली आहे. या आगीमुळे सुमारे २०० तंबू जळून खाक झाले. तंबूंमध्ये असलेल्या मालमत्तेची हानी झाली. महाकुंभमेळ्यासाठी नियुक्त केलेल्या अग्निशमन दलाच्या पथकाने आग नियंत्रणात आणली आहे.

सेक्टर १९ मधील शास्त्री पूल ते रेल्वे पूल दरम्यानच्या परिसरातील एका तंबूत झालेल्या सिलेंडर स्फोटामुळे आग लागली होती. अग्निशमन दलाचे पथक तसेच एनडीआरएफ आणि एसडीआरएफ यांनी संयुक्त कारवाई करुन आग नियंत्रणात आणली.

घटनेची माहिती मिळताच मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ तातडीने घटनास्थळाच्या दिशेने निघाले आहेत. ते पाहणी करुन आणि परिस्थितीचा आढावा घेऊन प्रशासनाला पुढील आवश्यक कामांसाठी सूचना करणार असल्याचे समजते. पंतप्रधान मोदी यांनी घटनेची माहिती मिळताच लगेच उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याशी फोनवरुन बातचीत केली. मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधान मोदींना घटनेबाबत थोडक्यात माहिती दिली आहे. सविस्तर माहिती पाहणीनंतर दिली जाईल. आग प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी दिले आहेत.

महाकुंभमेळ्यात तंबू असलेल्या परिसरात आग लागल्याची माहिती संध्याकाळी चारच्या सुमारास मिळाली. यानंतर तातडीने वीस बंब गाड्यांच्या मदतीने अग्निशमन दलाने आगीवर नियंत्रण मिळवले. आग लागल्यामुळे जीवितहानी झालेली नाही पण वित्तहानी झाल्याचे समजते. नेमके किती नुकसान झाले याची आकडेवारी अद्याप जाहीर झालेली नाही.

महाकुंभ मेळ्यात सोमवार १३ जानेवारी २०२५ रोजी पौष पौर्णिमेचे सामान्य स्नान तसेच मंगळवार १४ जानेवारी २०२५ रोजी मकरसंक्रांतीचे शाही स्नान झाले आहे. या व्यतिरिक्त दररोज लाखो भाविक गंगा नदीवर पवित्र स्नान करण्यासाठी येत आहेत. आता बुधवार २९ जानेवारी २०२५ रोजी मौनी अमावस्येनिमित्त आणि सोमवार ३ फेब्रुवारी २०२५ रोजी बसंत पंचमी अर्थात वसंत पंचमीनिमित्त महाकुंभमेळ्यात शाही स्नान होणार आहे. या व्यतिरिक्त बुधवार १२ फेब्रुवारी २०२५ रोजी माघ पौर्णिमेनिमित्त आणि बुधवार २६ फेब्रुवारी २०२५ रोजी महाशिवरात्रीनिमित्त महाकुंभमेळ्यात सामान्य स्नान होणार आहे.

भारतात चार महत्त्वाची तीर्थक्षेत्र आहेत. या ठिकाणी कुंभमेळ्याचे आयोजन केले जाते. मध्य प्रदेश येथे उज्जैनमध्ये क्षिप्रा नदीच्या पात्रात कुंभमेळा होतो. उत्तर प्रदेशात प्रयागराज येथे संगमावर तसेच हरिद्वार येथे गंगा नदीच्या पात्रात कुंभमेळ्याचे आयोजन केले जाते.

या व्यतिरिक्त महाराष्ट्रात नाशिक जिल्ह्यात गोदावरी नदीच्या पात्रात कुंभमेळ्याचे आयोजन केले जाते. प्रत्येकवेळी ४५ दिवसांसाठी कुंभमेळ्याचे आयोजन करतात. कुंभमेळ्याच्या निमित्ताने धार्मिक प्रदर्शनांचे तसेच धार्मिक चर्चासत्रांचे आणि प्रवचनांचे आयोजन केले जाते. वेद, चरक संहिता, पुराण आणि ज्योतिषशास्त्र या विषयांशी संबंधित विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

# वाद झाल्यानंतर हॉलतिकिटांवरून काढून टाकले जातीचे उल्लेख!



मुंबई : दहावी बारावीच्या परीक्षा काही दिवसांवर येऊन ठेपल्या आहेत. राज्य शिक्षण मंडळाच्या या परीक्षा करियरच्या दृष्टिकोनातून महत्त्वाच्या मानल्या जातात. काही दिवसांपूर्वीच या परीक्षेच्या हॉलतिकीटांचे वाटप करण्यात आले होते. या हॉलतिकिटांवर विद्यार्थ्यांच्या नावासह त्यांच्या जातीचा सुद्धा उल्लेख केला होता. यावरून राज्य शिक्षण मंडळावर अनेकांनी टीका केली अखेर शिक्षण मंडळाने हा निर्णय रद्द केला आला आहे.

महाविद्यालयात राज्य शिक्षण मंडळाच्या फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या १२ वीच्या परीक्षांच्या प्रवेशपत्रिकांचे वितरण सुरू झाले. त्यावर जातीचा उल्लेख केला गेला होता. त्यातच काही विद्यार्थ्यांच्या जातीची नोंद चुकीची असल्याचेही निदर्शनात आले. शाळेत प्रवेश घेताना जातीची चुकीची नोंद झाली असेल आणि पुढील प्रवेशासाठी विशिष्ट प्रवर्गातून प्रवेश घ्यायचा असेल तर जातीची योग्य नोंदणी आवश्यक असते. शाळेतील जातीची नोंद कळावी त्यामध्ये सुधारणा असल्यास शाळा सोडल्याचा दाखला घेताना त्यावर सुधारित जात यावी अशा उद्देशाने मंडळाने जातीचा उल्लेख केला होता. मात्र आता लोकभावनेचा आदर करत, तो मागे घेत असल्याचे स्पष्टीकरण राज्य शिक्षण मंडळाने दिले आहे. येत्या २३ तारखेपासून बारावीच्या विद्यार्थ्यांना नवीन हॉलतिकिटे ॲडमिट कार्डच्या लिंकद्वारे डाऊनलोड करता येईल. आणि १०वीच्या विद्यार्थ्यांना २० जानेवारीपासून हॉलतिकीट देण्यात येतील.

## महाराष्ट्रात हत्तींना हिवाळी सुट्टी!

गडचिरोली : मेळघाट किंवा गडचिरोली येथे पर्यटकांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यातील हत्तींना पुढील काही दिवस हिवाळी सुट्टीवर पाठवण्यात येणार आहे. त्यामुळे याकाळात गडचिरोली येथे हत्ती पहायला जाणाऱ्यांना हत्ती न दिसण्याचा अंदाज दिला जात आहे. गडचिरोली जिल्ह्यातील कमलापूर येथील सरकारी 'हत्ती छावणी' मध्ये सध्या नऊ हत्ती कार्यरत आहेत. बसंती, रूपा, अजित, मंगला, राणी, प्रियंका, गणेश, लक्ष्मी, कुसुम. तथापि, या नऊ हत्तींना २० जानेवारी ते २९ जानेवारी पर्यंत रजेवर पाठवण्यात येत आहे. त्यामुळे 'हत्ती छावणी' दहा दिवसांसाठी बंद राहणार आहे. तर दुसरीकडे मेळघाट व्याघ्र प्रकल्पाअंतर्गत कोळकास येथील हत्तींना १० जानेवारी ते २५ जानेवारी अशा १५ दिवसांच्या वैद्यकीय सुट्टीवर पाठवण्यात आले असून या काळात हत्ती सफारी बंद असणार आहे. हत्तींसाठी हा वार्षिक विशेष वैद्यकीय रजेचा काल असतो. जानेवारीच्या थंडीत त्यांच्या पायांना भेगा पडू नये यासाठी त्यांच्या पायांवर विशेष उपचार केले जाते. ज्याला चोपिंग असे म्हणतात. चोपिंगमध्ये हत्तींच्या पायांना ४० ते ४५ औषधी वनस्पतींचं मिश्रण लावण्यात येतं. दहा दिवस हत्ती डॉक्टरांच्या देखरेखी खाली असतात. त्यांच्या पायांना अधिकाधिक विश्रांती मिळावी असा उद्देश असल्याने त्यांना फारशी हालचाल करू दिलं जात नाही. शिवाय त्यांना कुठलंही काम करू दिलं जात नाही. याशिवाय, त्यांच्या प्रकृती संदर्भातील तपासणी, रक्त चाचणी वगैरे केल्या जातात.




# रायगडमधील २६ प्राथमिक शाळांना ठोकले टाळे!

अलिबाग : खासगी शाळांकडे पालकांचा वाढता कल पहाता पटसंख्येअभावी रायगड जिल्ह्यातील २६ शाळा बंद झाल्या आहेत. या शाळांमधील अन्य विद्यार्थ्यांचे जवळच्या शाळेत समायोजन केले जाणार आहे. सातत्याने घटणारी पटसंख्या ही चिंतेची बाब असून, खासगी शाळांकडे पालकांचा वाढता कल हे यामागचे प्रमुख कारण ठरले आहे. मोफत शिक्षण, मोफत पुस्तके, मोफत गणवेश, मोफत मध्यान्ह भोजन यासारख्या सोयीसुविधा देऊनही रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थी संख्या वाढविण्यात शिक्षण विभागाला अपयश येत आहे. जिल्हा परिषदेच्या दोन हजार ५२८ शाळा कार्यरत होत्या. यांपैकी २६ शाळा पटसंख्याअभावी बंद झाल्या आहेत. त्यामुळे आता सुरू असलेल्या शाळांची संख्या घटून दोन हजार ५०२ वर आली आहे. महत्त्वाची बाब म्हणजे गेल्या पाच वर्षात शंभरहून अधिक शाळा बंद झाल्या आहेत.

जिल्ह्यात पहिली ते आठवी शाळेत ८७ हजार १४५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मात्र, गेल्या काही वर्षांचा कल लक्षात घेतल्यास २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थी संख्या अजून घटण्याची शक्यता आहे. बंद पडलेल्या २६ शाळांमध्ये अलिबाग तालुक्यातील दोन, पेण तालुक्यातील दोन, कर्जत तालुक्यातील एक रोहा तालुक्यातील सहा, माणगाव तालुक्यातील सहा, श्रीवर्धन तालुक्यातील तीन, पोलादपूर तालुक्यातील तीन, तर महाड तालुक्यातील तीन शाळांचा समावेश आहे.



सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## मारुती सुजुकीने सादर केली आपली पहिली इलेक्ट्रिक एसयूवी - ई विटारा

नवी दिल्ली : सर्वांसाठी कार्बन मुक्तता आणि मोबिलिटीच्या आनंदासाठी आपल्या वचनबद्धतेची प्रदर्शना करत, मारुती सुजुकी इंडिया लिमिटेड (एमएसआयएल) ने आज आपली पहिली बीईवी (बैटरी इलेक्ट्रिक वाहन) एसयूवी - ई विटारा सादर केली, तसेच भारत मोबिलिटी ग्लोबल एक्सपो २०२५ मध्ये व्यापक ई फॉर मी ' इलेक्ट्रिक इको-उपाय सादर केले हार्टेक्ट-ई प्लॅटफॉर्मवर आधारित,ई विटारा उत्कृष्ट कार्यप्रदर्शन आणि अप्रतिबंधित आराम आणि सुरक्षा सह उत्कृष्ट रेंज प्रदान करते. प्रीमियम नेक्सा चॅनेलमध्ये लॉन्च होण्यासाठी तयार असलेल्या ई विटारा मध्ये नेक्सा चे मुख्य मूल्य - नाविन्य, सुसंस्कृती आणि प्रीमियम ग्राहक अनुभव समाविष्ट आहेत.

## 'तेनाली रामा' मालिकेत पंकज बेरीची दुहेरी भूमिका

तेनाली रामा' या ऐतिहासिक मालिकेतील चटपटीत गोष्टी आणि महान व्यक्तिरेखांनी प्रेक्षकांचे मन जिंकून घेतले आहे. आपले व्यवहारचातुर्य आणि विनोदबुद्धी याबद्दल प्रसिद्ध असलेला तेनाली त्यांच्या समस्या सोडवण्याच्या चातुर्याने प्रेक्षकांना अचंबित करतो, तर धूर्त आणि वाक्पटू तथाचार्यांशी असलेले त्याचे नाते प्रेक्षकांचे मनोरंजन करते. तथाचार्यांची भूमिका करणारा अभिनेता पंकज बेरी आता कथानकातील एका रोचक वळणावर दुहेरी भूमिका करताना दिसत आहे. तथाचार्यांची भूमिका करत असतानाच त्यांच्यासारख्याच दिसणाऱ्या वेंकण्णाची भूमिका देखील पंकज बेरी करत आहे.

## जेएसडब्ल्यू एमजी मोटरने एनईव्ही पोर्टफोलिओचा विस्तार

पुणे : जेएसडब्ल्यू एमजी मोटर इंडियाने दोन नवीन मॉडेल्सच्या लाँचसह 'सुलभ लक्झरीच्या' एका नवीन युगात प्रवेश केला. हे नवीन मॉडेल आहेत - भारतातील पहिले पूर्ण-इलेक्ट्रिक रोडस्टर एमजी सायबरस्टर आणि भारतातील पहिले इलेक्ट्रिक तीन-रो प्रेसिडेंशियल लिमोझिन एमजी एम९; हे या वर्षी लाँच केले जाणार आहेत. आज इंडिया मोबिलिटी ग्लोबल एक्स्पो २०२५ मध्ये अनावरण झालेल्या नवीन लक्झरी ब्रँड चॅनेल एमजी सिलेक्ट अंतर्गत पदार्पण करणारे हे नवीन मॉडेल्स भारतात गतिशीलतेच्या नवीन युगाची सुरुवात करण्याच्या कंपनीच्या दृष्टिकोनाचे प्रतिबिंबित करतात - जे बुद्धिमान, शाश्वत आणि ग्राहक-केंद्रित आहे. एमजी सायबरस्टर आणि एम९ साठी प्री-रिझर्वेशन आजपासून सुरू होत आहे आणि ग्राहक www.mgselect.co.in वर लॉग इन करून या दोन्ही कार प्री-बुकिंग करू शकतात. या दोन नवीन मॉडेल्ससह, ब्रँडकडे लवकरच पाच वेगवेगळ्या विभागांसह सर्वात मोठा इलेक्ट्रिक वाहन पोर्टफोलिओ असेल, ज्यामध्ये एमजी विंडसरचा समावेश आहे, जी लाँच झाल्यापासून सर्वाधिक विक्री होणारी इलेक्ट्रिक कार आहे, त्यात एमजी कॉमेट आणि एमजी यांचाही समावेश असेल.

## बाल्कनीमधून खाली पडण्याच्या दृश्यासाठी मला खूप तयारी करावी लागली

सोनी सब वाहिनी त्यावरील प्रगतीशील आणि प्रेरणादायक मालिकांसाठी प्रसिद्ध आहे. पुष्पा इम्पॉसिबल ही देखील अशीच एक मालिका आहे. या मालिकेत पुष्पा (करुणा पांडे) या एका सिंगल मदरची प्रेरणादायक कहाणी सांगितली आहे. पुष्पा कणखरपणे आणि सकारात्मकतेने जीवनातील आव्हानांना तोंड देत असते. या मालिकेत इंद्राक्षी कांजीलाल एक महत्त्वाची भूमिका साकारत आहे. ती साकारत असलेली प्रार्थना ही बापोद्राची (जयेश भारभाया) प्रेमळ मुलगी आहे आणि ती पुष्पाची सून आहे. आपल्या मृदू स्वभावामुळे तिचे तिच्या पित्याशी दृढ नाते आहे आणि तिचा पिता देखील सदैव तिच्या पाठीशी खंबीरपणे उभा असतो.

## 'ओजी' सिंगल गाणे 'लव तेरे नाल' प्रदर्शित केले जात आहे झी म्यूझिक कंपनीतर्फे

झी टीव्हीवरील 'सा रे ग म प' या आयकॉनिक सिंगिंग रिॲलिटी शो ने आपल्या कला, भावना आणि मनोरंजनाच्या अचूक मिलाफाचा प्रेक्षकांचे लक्ष वेधून ठेवण्यात सातत्य राखले आहे. आता हा शो त्याच्या थरारक फिनालेपर्यंत पोहचला पासून सचिन-जिगर, सचेत-परंपरा आणि गुरु रंधावा या नावाजलेल्या मेंटॉर्सच्या मार्गदर्शनाखाली कसलेल्या कलाकारांमध्ये रुपांतर झालेल्या स्पर्धकांचे अव्वल परफॉर्मन्सेस प्रेक्षकांना पाहायला मिळत आहेत. या वीकेंडचा एपिसोड हासुद्धा एका संगीत पर्वणीपेक्षा कमी असणार नाहीये कारण पाहायला मिळतील सर्वोच्च ६ स्पर्धकांचे असाधारण परफॉर्मन्सेस.

## सोनी सबवरील कलाकार शीहान कपाही आणि देशना दुगड तेनाली रामाचे चाहते

युवा कलाकार शीहान कपाही आणि देशना दुगड सोनी सबवरील लोकप्रिय मालिका 'वागले की दुनिया: नई पीढी नए किस्से' आणि 'पुष्पा इम्पॉसिबल' मधील त्यांच्या परफॉर्मन्सबद्दल ओळखले जातात. अलीकडेच या दोन्ही कलाकारांना 'तेनाली रामा' मालिकेच्या सेट्सवर तेनाली रामा (कृष्ण भारद्वाज) या आपल्या आवडत्या पात्राला भेटण्याची संधी मिळाली. या चतुर व्यक्तिरखेचे चाहते असणाऱ्या या दोन्ही कलाकारांना आपल्या या पडद्यावरील आदर्शाला भेटण्याचा दुर्मिळ योग आला. 'तेनाली रामा' हे पात्र साकारणाऱ्या कृष्ण भारद्वाज या अभिनेत्याशी त्यांनी खूप उत्साहाने गप्पा गोष्टी केल्या आणि त्या मालिकेत आपल्याला काय काय आवडते हे त्याला सांगितले.

## रियलमीचा रंग बदलणारा कोल्ड-सेन्सिटिव्ह स्मार्टफोन लाँच

छत्रपती संभाजीनगर, १८ जानेवारी २०२५ : भारतीय तरुणांमध्ये सर्वात लोकप्रिय स्मार्टफोन ब्रँड असलेल्या रियलमीने त्याच्या स्मार्टफोन आणि एआयओटीच्या पोर्टफोलिओमधील अभूतपूर्व उत्पादने असलेले बहुप्रतिक्षित असे रियलमी १४ प्रो सिरीज ५जी आणि रियलमी बड्स वायरलेस ५ एएनसी लाँच करत असल्याची आज घोषणा केली.रियलमी १४ प्रो सिरीज ५जी मध्ये रियलमी १४ प्रो ५जी आणि रियलमी १४ प्रो प्लस ५जी ह्या दोन नाविन्यपूर्ण मॉडेल्सचा समावेश आहे. हे दोन्ही फोन व्हॅल्यूर डिझायनर्स या सुप्रसिद्ध डॅनिश डिझाइन स्टुडिओच्या सहकार्याने तयार केले आहेत, ज्यामुळे हे स्मार्टफोन जगातील पहिल्या कोल्ड-सेन्सिटिव्ह रंग-बदलणाऱ्या स्मार्टफोनची सुरुवात आहेत. नव्याने पुनरुज्जीवित केलेल्या रियलमी नंबर सिरीजमधील पहिले प्रॉडक्ट म्हणून रियलमी १४ प्रो सिरीज ५जी चा उद्देश मध्यम-श्रेणीच्या स्मार्टफोनमध्ये फ्लॅगशिप फीचर्सना लोकप्रिय करणे, डिझाइन, इमेजिंग आणि कार्यक्षमतेत उल्लेखनीय प्रगती करणे हा आहे. रियलमी १४ प्रो प्लस ५जी हा पर्ल व्हाइट, सुएड ग्रे आणि भारतातील विशेष रंगप्रकार म्हणून पहिल्यांदाच बिकानेर पर्पल अशा तीन आकर्षक रंगांमध्ये आणि ८जीबी + १२८ जीबी (किंमत रु. २७,९९९), ८जीबी + २५६जीबी (किंमत रु. २९,९९९) आणि १२जीबी + २५६ जीबी (किंमत रु. ३०,९९९) अशा तीन स्टोरेज प्रकारांमध्ये उपलब्ध आहे, यामुळे तो सर्व प्रकारच्या वापरकर्त्यांच्या आवडीनिवडी आणि गरजांना पूर्ण करतो. रियलमी १४ प्रो ५जी हा पर्ल व्हाइट, सुएड ग्रे आणि भारतातील विशेष रंगप्रकार म्हणून पहिल्यांदाच जयपूर पिंक अशा तीन आकर्षक रंगांमध्ये आणि ८जीबी + १२८जीबी (किंमत रु.२२,९९९) आणि ८जीबी + २५६ जीबी (किंमत रु.२४,९९९) अशा दोन स्टोरेज प्रकारांमध्ये उपलब्ध आहे. रियलमी बड्स वायरलेस ५ एएनसी हे मिडनाईट ब्लॅक, ट्वायलाइट पर्पल आणि डॉन सिल्व्हर अशा तीन खास रंगांमध्ये उपलब्ध आहेत; त्यांची किंमत रु. १,७९९ इतकी असून डिस्काऊंटनंतर ते १,५९९ रुपयांमध्ये उपलब्ध असतील.



## माणिकराव जमादार यांचे निधन

तभा वृत्तसेवा

पैठण दि १९ : येथील राधाकिसन माणिकराव जमादार यांचे रविवारी दिनांक १९ जानेवारी २०२५ रोजी दुपारी १ वा. हृदविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे ८० वर्ष होते. ते माजी उपनगराध्यक्ष रामकृष्ण जमादार, जगन्नाथ जमादार, निळकंठ जमादार यांचे चुलते होत. त्यांच्या पश्चात मुलगा एक संजय जमादार व एक मुलगी शारदा मदने व नातू पणतू असा परिवार आहे, त्यांच्या पार्थिवावर नागघाट स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# आशियायी पाणपक्षी गणतेत आढळल्या शेकडो प्रजाती

तभा वृत्तसेवा

पैठण दि १९ : जायकवाडी पक्षी अभयारण्य येथे आशियायी पाणपक्षी गणना रविवारी करण्यात आली. पस्तीस हजार हेक्टर वर असलेल्या या अभयारण्यात सुमारे अठ्ठावीस ठिकाणी एकाच वेळी सकाळी सहा ते अकरा वाजेपर्यंत ही गणना झाली.

पक्षांच्या शेकडो प्रजाती आढळुन आल्या फ्लेमिंगो हा पक्षी शेकडोच्या थव्याने टाकळी, रामडोव्ह, मावसगव्हान परिसरात आढळला. जायकवाडीची जैविक विविधता कायम पण स्थलांतरित पक्षांची संख्या कमी झाल्याने या साठी विभागीय वन अधिकारी राहुल सपकाळ यांनी दहा पथके तयार केली होती यात बॉम्बे नेचरल हिस्ट्री सोसायटी (बीएचएनएस) व पैठण व छत्रपती संभाजीनगर येथील पक्षीमित्र, पक्षी



अभ्यासक, सहभागी झाले होते.

यामधे सोनेवाडी, जायकवाडी अभयारण्य भिंत, भाऊसाहेब नगर, या सह टाकळी, लांबगव्हाण, दहेगाव, विजापुर, वरखेड, कायगाव टोका, मावसगव्हण, रामडोव्ह, बोट हाऊस, जायकवाडी दक्षिण पंप हाऊस आदि ठिकाणाचा समावेश होता.

यात प्रामुख्याने स्थानिक व स्थलांतरित पक्षी आढळले फ्लेमिंगो कॉमन कूट (वारकरी) स्पॉट बिल (हळदी कुंकू), पोचार्ड, कार्मोरंट, सिगल, व्हिस्पर टर्न, रिव्हर टर्न, रेड कॅपेड आयबीस, ग्लॉसी आयबीस,ब्लॅक हेडेड आयबीस, ब्राम्ही डक,किंग फिशर, रॉबिन, ब्लॅक विंग स्टीव्ट, येलो वेगटेल आदि पक्षी आढळले.

पाणथळ जागेवर व जायकवाडी च्या पाणपसऱ्या वर हे पक्षी मोठ्या प्रमाणात आढळले अंतिम अहवाल सर्वांचे अहवाल एकत्र केल्यानंतर उद्या पर्यंत येण्याची येण्याची शक्यता या पक्षी गणनेसाठी विभागीय वन अधिकारी राहुल सपकाळ, वनपाल, अनिता जाधव, रूपाली सोळसे, श्रीमती

**दोन वर्षापूर्वी टॅग (रींग ) लावलेला ब्लॅक विंग स्टिल्ट हा पक्षी व रफ,ब्लॅक टेल गॉडविट, ग्रेटर थीकणी हे रशिया युरेशिया, मंगोलिया येथील स्थलांतरीत पक्षी मोहीजीत पोद्दार व प्रा. संतोष गव्हाणे, वनाधिकारी राहुल सपकाळ यांचे पथकास आढळून आले.**

शेख ,संदीप कराळे, राहुल तरवडे,सोमिनाथ बुधवंत, यांचे सह पैठण येथील पोलिस निरीक्षक संजय देशमुख, प्रा.संतोष गव्हाणे, दिलीप भगत, सुनील पायघन, बजरंग काळे, सुनील डिंगरे, अर्जुन कुचे यांचे सह मानद वनपाल डॉ. किशोर पाठक बीएचएनएस चे मोहीजीत पोदार, अभिनव नायर, कुणाल विभांडिक, किरण परदेशी, राहुल मराठे, प्रमिला मोरे, श्रवण परळीकर आदि नी सहभाग नोंदवला.

## जि.प.प्रा. शाळा रामजीनगर तंबाखू मुक्त शाळा म्हणून पहीला क्रमांक

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१९ जानेवारी

उपक्रमशिल शाळा म्हणून प्रसिद्ध असलेली जिल्हा परीषद प्राथमिक शाळा रामजीनगर या शाळेने सोयगाव गटशिक्षणाधिकारी रंगनाथ आढाव,विस्तार अधिकारी सचिन पाटील,सोयगाव केंद्राचे केंद्रप्रमुख फिरोज तडवी, केंद्रीय मुख्याध्यापक मोतीराम जोहरे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील सह शिक्षक गोपाल चौधरी यांनी



सलाम फाउंडेशन मुंबई यांच्या कडून तंबाखू मुक्त शाळे संदर्भात असलेले नऊ निकष पुर्ण करून सोयगाव केंद्रा मधून तंबाखू मुक्त शाळा म्हणून पहीला क्रमांक पटकविला आहे.याशाळेस सलाम मुंबई फाऊंडेशन कडून तंबाखू मुक्त शाळा म्हणून प्रमाणपत्र देण्यात आले आहे.या उपक्रमासाठी अध्यक्ष,उपाध्यक्ष, सदस्य शालेय व्यवस्थापन समिती,माता,पालक संघ,पालक यांचे सहकार्य लाभले आहे.

## राज्यस्तरीय शालेय किक-बॉक्सिंग स्पर्धेत यशोधन पवन घुगे यानी जिकंले कास्य पदक

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १९ जानेवारी : सातारा जिल्हा छत्रपती शाहू जिल्हा क्रीडा संकुल येथे दि १७ ते १९ जानेवारी रोजी आयोजित क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत झालेल्या राज्यस्तर शालेय किक-बॉक्सिंग स्पर्धेत छत्रपती संभाजी नगर जिल्ह्याचा गुणवंत खेळाडूं यशोधन घुगे, यानी वय वर्ष १७ वर्ष ३५ किलो मध्ये कास्य पदक जिकंले मिशन मार्शल आर्टस अँड वूशू कुंग-फू स्पोर्ट्स कराटे असोसिएशन छत्रपती संभाजी नगर संघटनेचा



या वर्षीचा उत्कृष्ट खेळाडू बनला आहे. यशोधन घुगेने किक बॉक्सिंग,वूशू,, बॉक्सिंग,कराटे, तायकांदो, बेल्ट रेस्टलिंग , बुडो मार्शल आर्ट, या आंतरराष्ट्रीय मार्शल आर्ट्स खेळामध्ये अभ्यासाबरोबर क्रीडा क्षेत्रात प्राविण्य मिळवत, कमी वयात क्रीडा क्षेत्रामध्ये स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे , यश मिळवल्या बद्दल मिशन मार्शल आर्टस संघटनेचे अध्यक्ष पवन घुगे, सचिव प्रविण घुगे, क्रीडा अधिकारी बाजीराव देसाई,माजी क्रीडा अधिकारी गोकुळ तांदळे, डॉक्टर सुरेश,जंगले. परभणी जिल्ह्या संघटनेचे जिल्हाध्यक्ष बालासाहेब बुधवंत, प्रशिक्षक राम बुधवंत, श्याम बुधवंत, राम चौरे, गौरव टोकटे, कृष्णा कानडे ब्लु व्हॅली शाळेचे अध्यक्ष सतीश तोतला, विश्वनाथ घुगे, व छत्रपती संभाजीनगर जिल्हा महिला कराटे संघटक राधा घुगे, प्रशिक्षिका नंदा घुगे, कोमल राठोड, ऋतुजा रणवळकर, ऋतुजा भालेराव, धनश्री सिदवाडकर, सपाटे सर, सुहास जायभाय, अनिल मिरकर, आदीने अभिनंदन केले आहेत. व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## 'चित्रपटाची तांत्रिक भाषा' विषयावरील परिसंवादास रसिकांचा उदंड प्रतिसाद

छत्रपती संभाजीनगर, दि. १८ : जगभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपट मराठवाड्यातील रसिकांपर्यंत पोहोचवणाऱ्या दहाव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये आज 'चित्रपटाची तांत्रिक भाषा' या विषयावरील परिसंवाद रसिक प्रेक्षकांच्या उदंड प्रतिसादात संपन्न झाला.

या परिसंवादात ऑस्कर विजेता साऊंड डिझाईनर रसूल पुकुट्टी, सिने छायाचित्रकार सी.के.मुरलीधरन, दिग्दर्शक आणि पटकथालेखक जिओ बेबी आणि चित्रपट संकलक (फिल्म एडिटर) दीपा भाटिया हे सहभागी झाले होते. या परिसंवादात संवादक म्हणून दिग्दर्शक जयप्रद देसाई यांनी काम पाहिले.




यावेळी बोलताना सिने छायाचित्रकार सी.के.मुरलीधरन म्हणाले, एक सिने छायाचित्रकार म्हणून काम करीत असताना अत्यंत बारकाईने काम करणे गरजेचे असते. आम्ही ३ इडियट्स या चित्रपटातील अखेरचा सीन करीत असताना सर्व बाबींवर लक्षपूर्वक काम केले.

चित्रपटात चित्रांप्रमाणे ध्वनी हा अत्यंत महत्त्वाचा घटक असून याचे महत्व सांगत असताना ऑस्कर विजेता साऊंड डिझाईनर रसूल पुकुट्टी यांनी 'जय हो' या सिनेमातील एक दृश्य ध्वनीशिवाय कसे दिसते आणि ध्वनीसमवेत कसे दिसते, याचे उदाहरण दर्शकांना प्रत्यक्षपणे दाखवले. आणि त्या ध्वनी मागील संपूर्ण कथा प्रेक्षकांना समजावून सांगितली.

जिओ बेबी यांनी आपल्या 'द ग्रेट इंडियन किचन' या सिनेमाबद्दल बोलताना सिनेमा त्यांच्या वैयक्तिक आयुष्याशी मिळता जुळता आहे असे सांगितले. चित्र आणि ध्वनी या सर्वांना एकत्र करून सिनेमा पूर्ण करण्याचे काम माझे आहे. सिनेमाला अजून कसे चांगले करता येईल, हे माझ्या हातात असते आणि ती जबाबदारी पार पाडताना मलाही खूप ठिकाणी लक्ष द्यावे लागते. ही जबाबदारी पूर्ण करून चित्रपट दर्शकांच्या भेटीला येतो, असे दीपा भाटिया यांनी सांगितले.

## अस्तित्वात असलेल्या कामगार रुग्णालयांत सर्व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात

### बुलंद छावा मराठा युवा परिषदेची मागणी

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : संपूर्ण राज्यात १८ नवीन कामगार रुग्णालये स्थापिन करण्यात येणार आहेत. बुलंद छावा मराठा युवा परिषदेच्या वतीने सरकारच्या या निर्णयाचे स्वागत करण्यात आले आहे. मात्र, राज्यात नवीन रुग्णालये स्थापन करण्याऐवजी प्रत्येक रुग्णालयात संपूर्ण उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशी सूचना छावाने केली आहे.

छत्रपती संभाजीनगर कामगार रुग्णालय १९९६ मध्ये सुरू झाले तेव्हापासून येथे अतिव दक्षता विभाग (आयसीयू) चालू झाला नसून, डॉक्टर आणि कर्मचारी भरतीसुद्धा झालेली नाही. कंत्राटी पद्धतीने मनुष्यबळाच्या आधारेच हे रग्णालय चालू आहे. या रुग्णालयात एमआरआय, सिटीस्कॅन उपलब्ध नसल्यामुळे रुग्णांना इतर रुग्णालयात रुग्णांना उपचार करून घ्यावे लागतात. इमारतीचा एक मजला रिकामाच आहे. स्पेशालिस्ट डॉक्टर नसल्यामुळे रुग्णांना टायप केलेल्या हॉस्पिटलमध्ये पाठवले जाते. शासकीय निवासस्थाने धूळ खात पडून आहेत. महाराष्ट्रामध्ये एकूण १३ रुणालये असून, प्रत्येक ठिकाणी अशीच परिस्थिती आहे. डिजिटर्ल एक्स-रे मशिनसाठी पाठपुरावा करून उपलब्ध झाली. परंतु, दोन महिन्यांपासून डिजिटर्ल एक्स-रे मशिन चालू न करता धूळखात पडून आहे. डिलेव्हरीसाठी महिला रुग्णांना वैद्यकीय महाविद्यालय किंवा इतर रुग्णालयात पाठवले जाते. त्यासाठी अगोदर कर्मचारी भरती व इतर सुविधा उपलब्ध करून द्याव्यात त्यानंतर नवीन रुग्णालये चालू करण्यात यावेत.

राज्य कामगार रुग्णालय, छत्रपती संभाजीनगरचे अधीक्षकांचे या गोष्टीकडे दुर्लक्ष होत आहे. याकडे राज्य कामगार विमा आयुक्त व प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र शासन यांनी या अधिकाऱ्यांची चौकशी करून कामगारांना न्याय मिळवून द्यावा. तसेच वरील विषयाकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास बुलंद छावा मराठा युवा परिषदेच्या वतीने राज्यातील सर्व विमा रुग्णालयांसमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा प्रदेश सचिव सुरेश वाकडे, प्रदेश कार्याध्यक्ष सतीश वेताळ, मराठवाडा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर जाधव, जिल्हाध्यक्ष प्रदीप हारदे, युवा जिल्हाध्यक्ष संदीप जाधव, जिल्हा उपाध्यक्ष दिलीप जाधव, जिल्हा कार्याध्यक्ष रामेश्वर राजगुरे, शहराध्यक्ष बाबासाहेब चौधरी, शिवाजी पळसकर, रतन काळे, योगेश देशमुख, विनोद बगळे, कृष्णा कदम, रवींद्र नीळ आदींनी दिला आहे.

## संघ हीच जीवनगाथा



### अलक (१९) महात्मा गांधी

परम पूजनीय सरसंघचालक नेहमीच म्हणायचे न हिंन्दुर्विदेशी भवेत् अर्थात देशातील एकही हिंदू विदेशी नाही. आता तर देश-विदेशातील संघ संमेलनाला वर्तमानपत्र वाले सुद्धा हिंदूमहासागर संबोधतात. वरील घोषणेप्रमाणेच मम दीक्षा हिंदू रक्षा। (माझे ध्येय हिंदू रक्षा) मम मंत्र समानता। (समानता माझा आदर्श) या घोषणा पण प्रचलित आहेत डॉक्टरजी नेहमी म्हणायचे आपल्या शरीरातील दूषित रक्तामुळे अंगावर फोड येतात त्यासाठी रक्त शुद्ध करणारे औषध सिद्ध करावे लागते. तसेच रोज परधर्मीयांकडून होणाऱ्या अत्याचाराच्या कटकटी मिटवण्यासाठी जागृत अनुशासित व स्वाभिमानी हिंदूमहासागर सिद्ध करावा लागेल. आणि त्यासाठीच संघ हीच जीवनगाथा म्हणून प्रत्येकाने अंगीकारावी. भारत माता की जय वंदे मातरम असे नारे देत श्रीनगरच्या लाल चौकात तिरंगा फडकवणारे संघवालेच होते. (क्रमशः)

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## भारतीय बहुउद्देशीय पत्रकार संघ तालुकाध्यक्षपदी अलिम चाऊस, उपाध्यक्षपदी सदाशिव जंगम यांची निवड



तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.१७: भारतीय बहुउद्देशीय पत्रकार संघ राज्य अध्यक्ष विजय बनसोड यांच्या प्रमुख उपस्थितीत नविन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.यावेळी गंगापूर तालुका भारतीय बहुउद्देशीय पत्रकार संघाच्या गंगापूर तालुकाध्यक्ष पदी अलिम चाऊस, तर तालुका सचिवपदी बाळासाहेब वाघमारे यांची निवड करण्यात आली आहे. नूतन कार्यकारणीत भारतीय बहुउद्देशी पत्रकार संघाच्या छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्षपदी शिवप्रसाद बन्सोड,जिल्हा सचिव इब्राहिम शेख, जिल्हा उपाध्यक्ष हारुण पठाण, जिल्हा उपाध्यक्ष जमील पठाण,गंगापूर तालुकाध्यक्ष अलिम ईसा चाऊस,गंगापूर तालुका सचिव बाळासाहेब वाघमारे, उपाध्यक्ष सदाशिव जंगम, दत्तात्रय जोशी, महंमद तांबोळी, सहसचिव विशाल जोशी, कार्याध्यक्ष धनंजय ठोंबरे, सहसचिव गिरीश गंगापूरकर, संहकोषाध्यक्ष रमेश ठोंबरे सहकार्याध्यक्ष नदीम बागवान, प्रसिद्धीप्रमुख लक्ष्मीकांत माघाडे, यांची निवड करण्यात आली.

## ऑनलाइन नोंदणी करा,भाजपाचे सदस्य व्हा : सुनील गवांडे



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि१९ जानेवारी : राज्य आणि केंद्रात भाजपाची सत्ता आहे.या माध्यमातून देशाचा विकास जलद गतीने सुरू आहे. त्यामुळे सोयगाव तालुक्यातील जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करावी,असे आवाहन शनिवारी भाजपनेते सुनील गवांडे यांनी केले. सोयगाव तालुक्यातील जरंडी गावात भाजपा सदस्यता नोंदणी महाअभियान राबविण्यात आले.याप्रसंगी माजी पंचायत समिती सदस्य संजीवन सोनवणे,दिलीप पाटील,संजय मोरे,गुरुदास पाटील आदींनी सोयगाव, जरंडी,निंबायती,आदी भागात दौरा करून अभियान राबविले.

मोबाइलच्या सहाय्याने ऑनलाइन पद्धीने सदस्य नोंदणी करता येते. तशी सुविधा पक्षाकडून उपलब्ध करून देण्यात आली आहे.त्यामुळे पदाधिकारी,कार्यकर्त्यांनी सोयगाव तालुक्यातून जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करण्यावर भर द्यावा,असे आवाहनही त्यांनी केले.यासाठी सत्यजित सोनवणे,अमोल उबाळे,साईदास पवार,माधव महाराज मोहिते आदींनी पुढाकार घेतला.

## स्कोडा कायलॅकने भारत एनसीएपी क्रॅश टेस्टमध्ये मिळवले ५ स्टार रेटिंग

छत्रपती संभाजीनगर, १८ जानेवारी २०२५ : स्कोडा ऑटो इंडियाची पहिली सब-४ मीटर एसयूव्ही कायलॅकला भारत एनसीएपी (न्यू कार अ‍ॅसेसमेंट प्रोग्राम)मध्ये प्रतिष्ठित ५-स्टार सेफ्टी रेटिंग मिळाले आहे. यासह कायलॅक भारत एनसीएपी टेस्टिंगमध्ये सहभाग घेणारी पहिली स्कोडा वेईकल ठरली आहे, जेथे कुशक व स्लाव्हियाने स्थापित केलेला सुरक्षितता सर्वोत्तमतेचा ब्रँडचा वारसा कायम ठेवला आहे. दोन्ही स्कोडा ऑटो इंडियाच्या २.० कार्सनी प्रौढ व्यक्ती व लहान मुलांच्या संरक्षणासाठी त्यांच्या संबंधित ग्लोबल एनसीएपी क्रॅश टेस्ट्समध्ये ५-स्टार सुरक्षितता रेटिंग्ज संपादित केले आहे.

स्कोडा ऑटो इंडियाचे ब्रँड संचालक पीटर जनेबा म्हणाले, ''स्कोडाच्या डीएनएमध्ये सुरक्षिततेला अधिक प्राधान्य दिले जाते आणि २००८ पासून प्रत्येक स्कोडा कार जागतिक स्तरावर क्रॅश-टेस्टेड करण्यात आली असून भारतात ५-स्टार सेफ्टी रेटिंग मिळाले आहे. स्कोडा ऑटो ५-स्टार सेफ्टी-रेटेड कार्सच्या ताफ्यासह भारतातील कार सुरक्षिततेवरील कॅम्पेनचे नेतृत्व करत आली आहे. आम्ही ग्लोबल एनसीएपी टेस्ट्स अंतर्गत प्रौढ व्यक्ती व लहान मुलांसाठी संपूर्ण ५-स्टार रेटिंग मिळवणारा पहिला ब्रँड होतो. आणि आता आमची नवीन सब-४-मीटर एसयूव्ही कायलॅक भारत एनसीएपी टेस्टिंगमध्ये तिच्या सेगमेंटमधील अव्वल वेईकल ठरली आहे. या कारमध्ये सर्वसमावेशक सुरक्षितता सिस्टम्स आहेत, ज्यामध्ये सहा एअरबॅग्जसह प्रमाणित म्हणून अ‍ॅक्टिव्ह व पॅसिव्ह सुरक्षितता वैशिष्ट्यांची व्यापक श्रेणी आहे. वापरण्यात आलेल्या हॉट-स्टॅम्प स्टील्स पुनर्रचित क्रॅश मॅनेजमेंट सिस्टम कायलॅकमध्ये सर्वोत्तम सुरक्षिततेची खात्री देते. या रेटिंगमधून भारतातील रस्त्यांवर युरोपियन तंत्रज्ञानाचे लोकशाहीकरण करण्याप्रती आमची कटिबद्धता दिसून येते, ज्यामध्ये पाया समाविष्ट आहे, ज्यावर कार निर्माण करण्यात येईल, जी सुरक्षित असेल.''

स्कोडा कायलॅकमधून प्रवाशांच्या सुरक्षिततेप्रती ब्रँडची कटिबद्धता दिसून येते. या कारच्या सर्व व्हेरिएण्ट्समध्ये प्रमाणित म्हणून २५ हून अधिक अ‍ॅक्टिव्ह व पॅसिव्ह सुरक्षितता तंत्रज्ञान आहेत. प्रबळ एमक्यूबी-एओ-इन प्लॅटफॉर्मवर निर्माण करण्यात आलेल्या कायलॅकमध्ये प्रगत इंजीनिअरिंग आणि नाविन्यपूर्ण वैशिष्ट्ये आहेत, जी भारतातील रस्ते व ड्रायव्हिंग स्थितींनुसार डिझाइन करण्यात आली आहेत. बेस व्हेरिएण्टपासून प्रमाणित म्हणून समाविष्ट करण्यात आलेली वैशिष्ट्ये सहा एअरबॅग्ज, इलेक्ट्रॉनिक स्टेबिलिटी कंट्रोल, रोल ओव्हर प्रोटेक्शन, हिल होल्ड कंट्रोल, मल्टी-कोलिजन ब्रेकिंग आणि एक्सडीएस+ सह कायलॅकने सुरक्षिततेसाठी मापदंड स्थापित केला आहे. हॉट-स्टॅम्प स्टील रचना आणि रिडिझाइन करण्यात आलेली क्रॅश मॅनेजमेंट सिस्टम केबिनमधील सुरक्षितता व अपघातामध्ये स्थिरतेत अधिक वाढ करते, ज्यामुळे ब्रँडचा सुरक्षितता-केंद्रित दृष्टीकोन अधिक दृढ होतो.

रोखठोक

दिनेश गुणे

# राजकारणातील संस्कृतिसंघर्ष!

स्वातंत्र्यापूर्वीच्या काही दशकांपासून व पुढे स्वातंत्र्यानंतरही या देशात राष्ट्रवाद या संकल्पनेविषयी संभ्रम माजविण्याचे प्रयोग सुरू असल्याचे दिसून येते. मुळात एकोणिसाव्या शतकापासून, विशेषतः औद्योगिक क्रांतीनंतर युरोपच्या इतिहासाला दिशा देणारी प्रेरणा म्हणून राष्ट्रवादाच्या संकल्पनेचा जन्म झाला अशी एक मांडणी केली जाते. जसजशी भौतिक प्रगती होत गेली, विज्ञानावर आधारित विकासाची व्याप्ती विस्तारत गेली आणि सारे काही विज्ञानाच्या कसोटीवर पडताळून पाहण्याची प्रवृत्ती वाढत गेली, तसतशी जुन्या रूढी, परंपरा आणि मूल्येदेखील याच कसोटीवर तपासली जाऊ लागली आणि यापैकी अनेक रूढी समाजाच्या हितास पोषक नाहीत असे स्पष्ट होऊ लागले. त्या रूढींचा त्याग करून नवी मूल्ये, नव्या निष्ठा निर्माण केल्या गेल्या, त्यामध्ये राष्ट्रवाद या संकल्पनेचा समावेश झाला असे म्हटले जाते. एका राजकीय दृष्टीने पाहिल्यास, राजकारणातील राष्ट्रवादाच्या विचाराची मुळे रुजण्याची प्रक्रिया अशी असू शकते. पण ही संकल्पना केवळ राजकारणापुरती मर्यादित नाही, तर समाजव्यवस्थेचा आणि समूहांना एकत्र राखण्यासाठी ज्या काही अस्मितांची भावनिक जाणीव जागी ठेवावी लागते, त्यापैकी राष्ट्रवाद ही संकल्पना प्राचीन काळापासून अस्तित्वात असल्याचे भारतीय समाजव्यवस्थेकडे पाहताना दिसून येते. केवळ भौगोलिक सीमांमुळे विभागले गेलेले प्रदेश काही सांस्कृतिक, धार्मिक आणि सामाजिक सामायिकतेमुळे एकमेकांशी भावनिकदृष्ट्या जोडले जातात आणि त्यातून परस्परांविषयी बंधुत्वाची, आपुलकीची भावना निर्माण होते, हे राष्ट्रवादाच्या विचाराचेच संस्कार आहेत. त्यामुळेच, भारताच्या प्राचीन परंपरांमध्ये राष्ट्रवादी हाच सामाजिक ऐक्याचा धागा असल्याचे दिसून येते. महाभारतासारख्या प्राचीन काव्यातही, परस्परांशी संघर्ष करणारे कौरव आणि पांडव आपल्या सामायिक शत्रूशी लढण्याची वेळ येताच एकत्र होतात आणि वयम् पंचाधिकं शतम् असे सांगत ऐक्याचे दर्शन घडवितात, तेव्हा त्यामागची प्रेरणाही राष्ट्रवादाचीच असते आणि देशाच्या कोणत्याही कोपऱ्यातील कोणतेही संकट हे देशावरील संकट असल्याची भावना आजही जागी राहते, त्यामागेही राष्ट्रवादाचीच भावना असते. थोडक्यात, राष्ट्रवादाच्या संकल्पनेतून भारताच्या इतिहासातील सामाजिक ऐक्याच्या जाणिवा अधोरेखित होत असतात. भारत हा केवळ भौगोलिक सीमांनी बांधला गेलेला जमिनीचा तुकडा नाही, तर तो जिवंत राष्ट्रपुरुष आहे, हिमालय हे त्याचे मस्तक आहे, काश्मीर हा मस्तकावरील मुकुट आहे, पंजाब आणि बंगाल हे त्या राष्ट्रपुरुषाचे दोन विशाल बाहू आहेत आणि पश्चिम व पूर्व घाट या त्याच्या मजबूत मांड्या आहेत. कन्याकुमारी हे त्याचे पाऊल आहे, असे वर्णन माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी आपल्या एका कवितेतून केले आहे. राष्ट्र या संकल्पनेचा असा काव्यात्म आविष्कार समाजाच्या अस्मिता आणि भावनिक ऐक्यासाठी साह्यभूत असताना, राष्ट्र या संकल्पनेसच छेद देऊन सामाजिक ऐक्याचा एकमेव मजबूत धागा खिळखिळा करण्याचे काही प्रयत्न सध्याच्या राजकीय संघर्षातून सुरू असल्याचे विचित्र चित्र अलिकडे देशात दिसू लागल्याने, हजारो वर्षांपासूनचा सामाजिक ऐक्याचा धागा दुबळा होण्याची भीती बळावत चालली आहे. कदाचित यामुळेच, काँग्रेसचे सर्वेसर्वा नेता राहुल गांधी यांच्या राष्ट्रविचारांचे दीर्घकालीन परिणाम गांभीर्याने विचारात घेण्याची गरज निर्माण झाली असावी.

सुसंस्कृत राष्ट्रे म्हणून जगाच्या पाठीवर ज्या काही मोजक्या देशांची ओळख इतिहासकाळापासून निर्माण झालेली आहे, त्यापैकी भारत हा एक देश आहे. भारताच्या समाजव्यवस्थेला आणि सांस्कृतिक परंपरेला थेट कांस्ययुगपूर्व काळाची परंपरा लाभलेली आहे. अलिकडच्या काही शतकांत कांस्ययुगपूर्व संस्कृतींपैकी काही संस्कृती लयास चाललेल्या असून त्यांचे केवळ अवशेष पाहावयास मिळतात. पण भारत मात्र, आपल्या परंपरा आणि संस्कृतीचे तितक्याच भावनिकतेने पालन करतो आणि त्यांचे जतन करतो. आजही सिंधू-सरस्वती संस्कृतीच्या किंवा त्याहूनही आधीच्या हजारो वर्षांपूर्वीचे रीतिरिवाजांचे आणि संस्कारांचे आचरण भारतात होते आणि मानवी संस्कृतीचा उदय झाला तेव्हापासून लिहिल्या, सांगितल्या गेलेल्या कालकथांचे आजही भारताच्या कानाकोपऱ्यात एकाच सामूहिक भावनेने पारायण केले जाते. हजारो वर्षांपूर्वी लिहिल्या गेलेल्या वेद-पुराणांचा उद्घोष आजही तितक्याच भक्तिभावाने देशाच्या कोणत्याही कोपऱ्यात केला जातो. सुसंस्कृत राष्ट्राची सारी लक्षणे भारतामध्ये आजही रसरशीतपणे जिवंत दिसतात, त्यामागेही राष्ट्रवादाची पिढ्यान्‌पिढ्यांपासून जपली गेलेली भावना हेच मूळ कारण आहे. राष्ट्र आणि सुसंस्कृत राष्ट्र यांमधील हा फरक भारतामध्ये पाहावयास मिळतो. इसवी सनाच्या सातव्या शतकात वेस्टफेलियाच्या शांततेतून राष्ट्र-राज्यपद्धती उदयास आली असे मानले जाते. राज्यपद्धती एखाद्या राष्ट्राच्या कारभारावर नियंत्रण ठेवते, राज्यकारभार चालविते व त्याचे व्यवस्थापन करते. सामान्यतः, धर्म, वंश, भाषा आणि संस्कृती यांचा संगम असलेला भूभाग म्हणजे राष्ट्र अशीही एक व्याख्या केली जाते. त्या दृष्टीने भारत हे एक संपूर्ण राष्ट्र तर आहेच, पण राष्ट्राची संस्कृती किंवा राष्ट्रीय सभ्यता ही त्याहूनही विशुद्ध अशी सामूहिक संकल्पना पिढ्यान्‌पिढ्यांपासून भारतात अस्तित्वात आहे. शक्य तितक्या अधिकाधिक मानवीसमूहांचे सर्वांत मोठे एकत्रीकरण आणि असा संपूर्ण मानवतापूर्ण समूह म्हणजे संस्कृती आणि असा समूह धारण करणारे ते राष्ट्र, अशी आपल्या राष्ट्रवादाची आणि सांस्कृतिक राष्ट्रवादाची संकल्पना भारतात केवळ अस्तित्वातच नव्हे, तर आचरणात आहे.

अशा संस्कृतिसंपन्न भारताकडे पाहण्याची दृष्टी स्वातंत्र्यानंतरच्या काळात राजकीय कारणांमुळे बदलत गेली. भारताला प्राचीन काळापासून एक जिवंत ओळख आहे याचा आज अनेकांना विसर पडत असून, स्वातंत्र्योत्तर काळात सत्तेवर असलेल्या काहींचाही त्यामध्ये समावेश आहे. भारत हा



एक अखंड, सामाजिक, सांस्कृतिक आणि पारंपरिकदृष्ट्या एकमेकांस अतूटपणे जोडलेला प्रदेश असल्याच्या जाणिवा पुसट होत गेल्या आणि भारतीय उपखंडातील बराचसा भाग जिंकल्यानंतर ब्रिटिशांनी एकत्र जोडलेला प्रदेश अशी भारताची नवी ओळख करून दिली जाऊ लागली. आपल्या शिक्षण व्यवस्थेनेही त्यास प्रोत्साहन दिले आणि भारताच्या सांस्कृतिक, शैक्षणिक परंपरा नाकारण्याची व भारतीयांना आपल्या प्राचीन आचारविचारांपासून दूर करण्याच्या प्रयत्नांची स्पर्धा सुरू झाली. आधुनिक भारताचे नेतृत्व करण्यासाठी सुरू असलेल्या धडपडीत परंपरा पुसण्याच्या प्रयत्नांना वेग आला. आपण कोण होतो आणि कोण आहोत या जाणिवांचा देशाला विसर पडण्यास सुरुवात होण्याआधीच सामाजिक जाणिवांच्या स्मृती पुसून टाकणे, त्यांचे ग्रंथविश्व, संस्कृती, इतिहास नष्ट करणे हा अस्मिता संपविण्याचा पहिला मार्ग असतो, असे कोणा पाश्चिमात्य विचारवंताने म्हटले आहे. गेल्या काही दशकांपासून भारतात याचेच प्रयोग सुरू असल्याचे दिसू लागले आहे.

एका बाजूला अशा प्रयत्नांची चढाओढ सुरू असताना, आपण कोण आहोत याच्या जाणिवा जाग्या राखण्यासाठी पंतप्रधान मोदी यांचे प्रयत्न सुरू झाले. आपण कोण आहोत हे विसरता कामा नये, हा संदेश देणारे अनेक उपक्रम सरकारी स्तरावर सुरू झाले आणि बहुसंख्य भारतीयांवर त्याचा प्रभावही दिसू लागला आहे. संस्कृतिसंपन्न इतिहासाशी आपले नाते जडलेले आहे, या संस्कृतीचे आपण वारस आहोत आणि ती आजही रसरशीतपणे जिवंत आहे, विविधतेमध्ये एकता हे या समाजजीवनाचे जिवंत उदाहरण आहे, हे आता स्पष्ट होऊ लागले आहे. आपल्या संस्कृतीची पाळेमुळे रुजली आहेत, त्याबद्दल भारतीयांना अभिमानच वाटला पाहिजे, त्यातूनच आपला देश आत्मविश्वासाने भारलेला देश म्हणून उभा राहील, आत्मनिर्भर होईल हे ओळखून इतिहासाचे व संस्कृतीचे पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न आता सुरू झाले असताना राष्ट्र या संकल्पनेचाच संकोच करण्याचे प्रयत्न सुरू व्हावेत हा केवळ योगायोग मानता येणार नाही.

सुमारे तीन वर्षांपूर्वी, २०२२ च्या मे महिन्यात काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी केंब्रिज विद्यापीठात भारताच्या राष्ट्रसंकल्पनेस धक्का दिला. भारत हे ब्रिटनसारखे राष्ट्र नसून युरोपियन युनियनसारखा राज्यांचा समूह आहे, या त्यांच्या विधानाने तेव्हाही खळबळ माजली होती. भारताला एक भौगोलिक ओळख आणि परंपरा असल्याचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मानतो, पण काँग्रेसचे तसे मत नाही. संघ आणि काँग्रेस यांमध्ये हाच फरक आहे, असे वक्तव्य त्यांनी त्या मुलाखतीत केले होते. त्यांच्या या भूमिकेकडे सहजपणे पाहता येणार नाही. आता तर ते लोकसभेतील विरोधी पक्षनेते असताना त्यांनी या भूमिकेचाच पुनरुच्चार केला आहे. दिल्लीतील इंदिरा भवन या काँग्रेस मुख्यालयाचे उद्घाटन केल्यानंतर गेल्या बुधवारी राहुल गांधी यांनी केलेल्या एका विधानामुळे त्याच वादाला आता नव्याने तोंड फुटले आहे. काँग्रेसचा संघर्ष हा राज्यांच्या विरोधात आहे, असे राहुल गांधी म्हणतात, तेव्हा ते भारताकडे एक संपूर्ण देश म्हणून पाहात नाहीत हे स्पष्ट होते. भारतीय राज्ये ही एक व्यापक संकल्पना आहे आणि त्यामध्ये राज्यघटनेनुसार काम करणाऱ्या सर्व यंत्रणांचा समावेश आहे. या सर्व यंत्रणांशी संघर्ष करण्याची काँग्रेसची भूमिका असेल, तर भारत हे एक राष्ट्र नाही, तर विविध राज्यांमधील चर्चेतून निर्माण झालेला एक करार आहे, ही काँग्रेसची विचारसरणी ठरते आणि अशी विचारसरणी म्हणजे भारताच्या सांस्कृतिक व सामाजिक ऐक्यावरील अविश्वासाचा पुरावा ठरतो. अशा अविश्वासामुळेच देशाच्या फाळणीसाठी काँग्रेस अनुकूल राहिली असा आक्षेप समाजातील अनेकांकडून आजही घेतला जातो. राहुल गांधी यांच्या ताज्या वक्तव्यांतूनही हाच अविश्वास डोकावताना दिसतो. भारतीय राज्यांविरुद्ध युद्ध पुकारण्याची इच्छा व्यक्त करणारे त्यांचे वक्तव्य साम्यवादी मानसिकतेशी साधर्म्य सांगणारे असून राहुल गांधी हे साम्यवादी किंवा नक्षल चळवळीच्या हातातील बाहुले झाले आहेत, असाही आक्षेप आता घेतला जाऊ लागला आहे. याच मानसिकतेतून लोकशाही व्यवस्थेवरही अविश्वास दाखविला गेला होता आणि श्रमिक वर्गाच्या हुकूमशाही निर्माण करण्याचा विचार मांडला गेला होता. लोकशाही व्यवस्थेतील एका जबाबदार पदावर असलेल्या राहुल गांधी यांनी जे वक्तव्य अलिकडेच देशात केले, तेच त्यांनी तीन वर्षांपूर्वी परदेशातही केले होते, हे या संदर्भात लक्षात घेणे गरजेचे आहे. ही विचारसरणी प्रचलित व्यवस्थेच्या व्यवस्थापनाशी सुसंगत नाही, उलट लेनिनच्या क्रांतिकारी विचारसरणीशी मिळतीजुळती आहे, असा आक्षेपही त्यामुळेच घेतला जात असून, राष्ट्रहिताशी विसंगत असलेली ही विचारसरणी देशात प्रस्थापित करण्यासाठी राहुल गांधी यांना वापरले जात असल्याची शंकाही आता व्यक्त होऊ लागली आहे. देशात जवळपास संपुष्टात येत असलेल्या नक्षलवादास राहुल गांधी यांच्या या भूमिकेमुळे संजीवनी मिळेल अशी भीतीही उघडपणे व्यक्त होऊ लागल्याने, राहुल गांधी यांच्या या विधानाकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे.

एका बाजूला सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या पुनरुज्जीवनाचे शिस्तबद्ध प्रयत्न सरकारी स्तरावर सुरू आहेत, तर दुसरीकडे साम्यवादी चळवळीचे नेते चारू मुजुमदार यांनी साडेपाच दशकांपूर्वी नोंदविलेल्या विचारांचे पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. भारतीय राज्य ही भांडवलदार वर्गाच्या हितसंबंधांची रचना आहे आणि त्या राज्यांशी युद्ध करून भारतीय राज्यव्यवस्थेस उद्ध्वस्त करणे हे नक्षलवादाचे मुख्य उद्दिष्ट आहे, असे मत १९६६ मध्ये मुजुमदार यांनी त्यांच्या 'हिस्टॉरिक एट डॉक्युमेंट्स' या दस्तावेजात मांडले होते. राहुल गांधी यांच्या वक्तव्यात या विचारांचेच प्रतिबिंब असल्याची भावना आज व्यक्त होत असून, नक्षलवाद व साम्यवादाचा हात धरून लोकशाही व्यवस्थेवरच प्रश्नचिन्हे उभी करण्याचा हा डाव नाही ना, अशी शंकाही व्यक्त होऊ लागली आहे. राहुल गांधी यांच्या या वक्तव्यामुळे सध्याच्या दोन राजकीय पक्षांमधील सांस्कृतिक संघर्षाचे रूप नेमके स्पष्ट होऊ लागले आहे. एका बाजूला पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या सांस्कृतिक परपरांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी सामाजिक प्रयत्नांस प्रोत्साहन देत आहेत, भारतीय परंपरा आणि सांस्कृतिक वारशाची विदेशास ओळख करून देण्यासाठी पुढाकार घेत आहेत आणि दुसरीकडे राहुल गांधी यांच्या विचारातून भारतीय सांस्कृतिक एकतेच्या संकल्पनेवरच प्रश्नचिन्हे उमटवत आहेत. एका दृष्टीने देशात राजकीय संस्कृतिसंघर्षाची चिन्हे आता दिसू लागली असून, नव्या पाश्चिमात्य संस्कृतीचा संपूर्ण स्वीकार करावयाचा की संपन्न ऐतिहासिक वारसा कायमचा पुसून टाकायचा याचा निर्णय करण्याकरिता समाजाने आपली समज पणाला लावायची वेळ आली आहे.

dineshgune@gmail.com

रविवारची पत्रे

## इंडिया आघाडीला घरघर

दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीमध्ये इंडिया आघाडीच्या बहुतेक सगळ्या घटक पक्षांनी आम आदमी पक्षाला आपला पाठिंबा जाहीर केल्यामुळे काँग्रेससह इंडिया आघाडीचे प्राण कंठाशी आले आहेत. समाजवादी पक्ष, तृणमूल काँग्रेस आणि उबाठा गटाने आम आदमी पक्षाला थेट पाठिंबा देऊ केला आहे. अर्थात या पक्षांची दिल्लीमध्ये किती ताकद आहे हा प्रश्न असला तरीही हा निर्णय इंडिया आघाडीच्या नरडीला नख लावण्यासाठी तो पुरेसा आहे. राष्ट्रीय जनता दलाच्या तेजस्वी यादव यांच्यासह बहुतेक पक्षांनी इंडिया आघाडीची निर्मिती केवळ लोकसभा निवडणुकीपुरतीच होती आणि भाजप हटाव हाच आपला एकमेव उद्देशासाठी ती स्थापन झालेली होती असे स्पष्ट केले आहे. प्रादेशिक स्तरावर आपापल्या राज्यात हे पक्ष, आपापल्या सोईप्रमाणे स्वतंत्रपणे/एकत्रित निवडणुका लढवू शकतात, असे स्पष्ट केले आहे.

दिल्लीमध्ये एकही आमदार-खासदार नसलेला काँग्रेस पक्ष यंदा स्वतंत्रपणे पूर्ण ताकदीने उतरला आहे. त्यामुळे दिल्लीमध्ये भाजपा, आम आदमी पक्ष आणि काँग्रेस अशी तिरंगी लढत बघायला मिळणार आहे. काँग्रेसनेत्यांनी अरविंद केजरीवालांवर जी विखारी टीका केली आहे ती बघता इंडिया आघाडीचे काही अस्तित्व आहे असे म्हणणे मतदारांना धोका देण्यासारखेच आहे. तरीही काही काँग्रेस नेते इंडिया आघाडी अजूनही अस्तित्वात असल्याचा जो डांगोरा पिटत आहे तो किती खोटा आहे हे घटक पक्षांच्या नेत्यांनी काँग्रेसवरच केलेल्या चिखलफेकीने सिद्ध झाले आहे.

केवळ २०२४ च्या लोकसभा निवडणुकीसाठी, भाजपाविरोधात एकत्र आलेल्या, पण एकमेकांबरोबर अन्य कोणत्याही बाबतीत एकमत नसलेल्या पक्षांनी, प्रादेशिक निवडणुकांमध्ये, काँग्रेसचा वरचष्मा सहन करायला इंडिया आघाडीच्या घटक पक्षांनी स्पष्टपणे नकार दिला आहे. राहुल गांधींच्या नावावर नाईलाज म्हणून लोकसभा विरोधी पक्षनेतेपदावर समझोता झालेला असला तरीही इंडिया आघाडीचे नेतेपद काँग्रेसला देण्यास एकही घटक पक्ष तयार नाही. अनेक निवडणुकांमध्ये एकटी काँग्रेस भाजपाबरोबर समोरासमोर टक्कर घ्यायला असमर्थ असल्याचे सिद्ध झाले. तेव्हा आता हेच प्रादेशिक पक्ष काँग्रेसलाच नखं दाखवायला तयार झाले आहेत. आपापल्या राज्यात प्रबळ असलेले प्रादेशिक पक्ष उघडपणे काँग्रेसला आव्हान देण्यास सिद्ध झाले आहेत.

प्रादेशिक स्तरावर एकमेकांना भ्रष्टाचारी/देशद्रोही म्हणणारे नेते राष्ट्रीय स्तरावर मात्र इंडिया आघाडीच्या नावाखाली एकत्र लढत असतील तर जनता त्यांना कशी मान्यता देईल? एखादा नेता राज्य निवडणुकीच्या वेळी भ्रष्टाचारी/देशद्रोही असणे आणि तोच लोकसभा निवडणुकीच्या वेळेस प्रामाणिक/देशभक्त होणे असा प्रचार करणे जनतेला मूर्ख समजण्यासारखेच आहे. जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांनी तर इंडिया आघाडीचे काहीही औचित्य राहिलेले नसल्याने ही आघाडी अधिकृतरीत्या बरखास्त करण्याची जी सूचना केली आहे, ती रास्तच आहे.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

## इस्रायल-हमास युद्धबंदी

अमेरिकचे नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सुचविल्याप्रमाणे आता, इस्रायल व हमास यांच्यात युद्धबंदी करार झाल्यामुळे पश्चिम आशियात शांतता नांदेल, अशी अपेक्षा करूया. इस्रायल जनतेच्या एका शांततेत चालू असलेल्या संगीतनृत्य कार्यक्रमात हमास अतिरेक्यांनी बेछूट गोळीबार करून अनेक निरपराध नागरिकांना ठार मारले, स्त्रियांवर अत्याचार केले व अनेकांना ओलिस ठेवले. इस्रायलने बदला घेण्यासाठी हमास व त्यांच्या मित्र संघटनांवर हल्ले केले. त्यात शहरे नष्ट झाली. यात दोन्हीकडले हजारो निरपराध लोक हकनाक मारले गेले. ही घटना मानवतेच्या दृष्टीने लज्जास्पद अशीच आहे. आशा आहे की आता हमास व इतर अतिरेकी हिंसक संघटना योग्य तो धडा शिकतील.

अमेरिकेत राष्ट्राध्यक्षाची सूत्रे हाती घेतल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प आता रशिया-युक्रेन संघर्षात सुद्धा मध्यस्थी करून सर्वत्र शांतता नांदेल याबद्दल प्रयत्नशील राहतील. अशाच प्रकारे बांगलादेश, पाकिस्तान या देशात हिंदू व इतर अल्पसंख्यकांवर होणारे अत्याचार व हिंसा थांबण्याबद्दलही प्रयत्न होतील याबद्दल आशावादी राहूया.

**गणेश ज. हजारे**/८६९८८१५५५९

## 'पनून काश्मीर'ची मागणी योग्य!

१९ जानेवारी १९९० या दिवशी मुस्लिमांनी मशिदींमधून 'हिंदूंनो, काश्मीरमधून चालते व्हा!' अशा घोषणा देत लाखो हिंदूंना काश्मीरमधून हाकलून लावले. एका रात्रीत काश्मीरमधील हजारो हिंदूंच्या हत्या करण्यात आल्या आणि साडेचार लाख काश्मिरी हिंदू विस्थापित झाले. एका रात्रीतून हिंदूंना वडिलोपार्जित शेती, वास्तू सगळं काही जसेच्या तसे सोडून जावे लागले. त्यांच्या मनाला किती वेदना झाल्या असतील, याची कल्पनाही करवत नाही. दुर्दैव म्हणजे हे स्वतंत्र भारतात घडलं आणि आजही आपले बांधव आपल्याच देशात आश्रिताचे जीवन जगत आहेत.

मुसलमानांनी प्रचंड प्रमाणात हिंसाचार केला, सामूहिक हत्या केल्या, हिंदू स्त्रियांवर बलात्कार केला. या नरसंहारात पीडित हिंदूंच्या भूमी आणि संपत्ती त्यांनी बळकावली. तेव्हापासून आजपर्यंत काश्मिरी हिंदू त्यांची काश्मीरमधील मालमत्ता आणि सांस्कृतिक वारसा परत मिळवू शकलेले नाहीत. या क्रूर घटनेला ३५ वर्षे पूर्ण झाली, तरी काश्मिरी हिंदू अद्याप विस्थापितांचेच जीवन जगत आहेत. काश्मिरी हिंदूंना तेथे परतण्यासाठी सुरक्षित वातावरणाची आवश्यकता आहे. त्याकरिता शासनाने कठोर निर्णय घेणे अपेक्षित आहे. तसा थोडा प्रयत्न शासनाने कलम ३७० निष्प्रभ करून केला आहे. त्यानुसार आता देशातील हिंदू काश्मीरमध्ये जागा विकत घेऊन राहू शकणार आहेत. परंतु काश्मीर खोऱ्यात हिंदूंची सुरक्षितता हा महत्त्वाचा मुद्दा आहे. ती मिळवण्यासाठी काश्मीरमधील जिहादी मानसिकता आणि जिहादी आतंकवाद दोन्ही नष्ट करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. तसेच काश्मिरी हिंदू करत असलेली 'पनून काश्मीर'ची मागणी देखील योग्य आहे. त्यामुळे तेथील हिंदूंचे निश्चितपणे संरक्षण आणि त्यांचा विकास होऊ शकेल.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

## राष्ट्रीय मतदार दिन आणि आधुनिक तंत्रज्ञान

आपल्याकडे वेगवेगळ्या स्तरावर नेहमीच निवडणुका होत असतात. अगदी पंचवार्षिक निवडणुकांना एक वर्ष पूर्ण होण्याआधीच पुढील निवडणुकांचे पडघम वाजू लागतात. बँका, पतसंस्था, सोसायट्या, स्थानिक स्वराज्य संस्था याबरोबरच विद्यापीठासारख्या उच्च शैक्षणिक संस्थांमध्येही वेगवेगळ्या अधिकार मंडळांच्या निवडणुका होत असतात. त्यामुळे सातत्याने या ना त्या निवडणुकीच्या धामधुमीत सर्वच राजकीय पक्ष, समाजातील सर्वच घटक व्यस्त राहतात. निवडणुकीचे काम हे राष्ट्रीय काम आहे आणि ते एक पवित्र कर्तव्य असल्यामुळे अधिकाधिक तरुण मतदारांना राजकीय प्रक्रियेत भाग घेण्यास प्रोत्साहित करण्यासाठी भारत सरकार दरवर्षी २५ जानेवारीला 'राष्ट्रीय मतदार दिन' म्हणून साजरा करते. २५ जानेवारी हा भारतीय निवडणूक आयोगाचा स्थापना दिवस होता. दरवर्षी, राष्ट्रीय मतदार दिन नवी दिल्लीत राष्ट्रपतींच्या उपस्थितीत साजरा केला जातो.

निवडणूक हा लोकशाहीचा गाभा असून भारत हा जगातील सर्वांत मोठा लोकशाही देश आहे. प्रत्येक नागरिकाला मतदानाचे मूलभूत अधिकार आहेत. देशाच्या नेतृत्वात, सामान्य लोकांच्या समस्या सोडवण्यास, बदल घडवून आणण्यास सक्षम वाटतो असा नेता निवडण्याचा प्रत्येक मतदाराला अधिकार आहे. मतदारांचा निवडणूक प्रक्रियेत प्रभावी सहभाग वाढवणे आवश्यक आहे. यापूर्वी मतदारांचे पात्रता वय २१ वर्षे होते; परंतु १९८८ मध्ये ते कमी करून १८ वर्षे केले गेले. भारतीय



तरुणांची राजकीय जागरूकता पातळी प्रौढांपेक्षा खूपच जास्त आहे आणि येत्या काळात ते देशातील राजकीय बदलांमध्ये सर्वांत मोठे योगदान देतील. भारत हा युवकांचा देश आहे व त्यामुळे युवा पिढीशी सहभागासाठी संवाद अत्यावश्यक आहे आणि इथेच आधुनिक तंत्रज्ञान आपल्याला मदत करू शकते. आधुनिक स्मार्ट तंत्रज्ञान आता प्रत्येक मतदाराच्या हाती आलं आहे. त्यामुळे सभा फोनवर बसल्याबसल्या ऐकता येतात. त्यासाठी सभास्थानी जायची गरज नाही. यापुढची पायरी गाठण्याची वेळ आता आली आहे. मतदान केंद्रात न जाता मोबाईल अथवा संगणकावर ऑनलाईन व्होटिंग निवडणूक आयोगाने एक पर्याय म्हणून स्वीकारला पाहिजे. अनेक मतदारांना प्रत्यक्ष मतदान अनेक सबळ कारणाने इच्छा असूनही करता येत नाही. अशा मतदारांना हा पर्याय मिळेल व त्यामुळे मतदानाची टक्केवारी नक्कीच वाढेल. ऑस्ट्रेलिया, कॅनडा, अस्टोनिया, फिनलॅण्ड, फ्रान्स आणि नॉर्वे या देशांत याचे प्रयोग केले आहेत. व्होटर हेल्पलाईन ॲपदेखील सुरू करण्यात आले आहे. मतदार यादीतील मतदारांच्या नावे पडताळणीसाठी मतदारांना ते वापरता येते. प्रत्यक्ष मतदानाच्या वेळी मतदारांसाठी निवडणूक छायाचित्र ओळखपत्रांचा वापर केल्याने अनेक गैरप्रकार टळत आहेत. मतदार संघातील डी-डुप्लिकेशन सॉफ्टवेअरचा वापर करून मतदारयादीतील एकाच नावाच्या विविध व्यक्तींची ओळखपत्राद्वारे खातरजमा केली जाते. पूर्वी अनेक मतदारसंघात समान नाव असल्यामुळे गैरप्रकार होत असत. मुख्यालयाशी सीसीटीव्ही जोडून रेकॉर्ड करणे, ड्रोन कॅमेरे मतदान केंद्रावर टेहळणीसाठी वापरावे व त्या माहितीचे वेब अनलिटिकसद्वारे पृथक्करण करून फक्त अपवादात्मक विशेष परिस्थितीचे नियंत्रण करता येणे शक्य झाले आहे.

निवडणुकादरम्यान नागरिकांना आदर्श आचारसंहिता आणि खर्चाच्या उल्लंघनाचा अहवाल देण्यासाठी सिव्हिजिल हे एक अभिनव मोबाईल ॲप आहे. कुठलाही नागरिक ही सेवा वापरू शकतो. या ॲपचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे ते केवळ स्थान ग्रहणासह थेट फोटो/व्हिडीओला अनुमती देते. कुठल्याही प्रकारची आचारसंहितेचे उल्लंघन झाल्याची घटना पाहिल्यानंतर काही मिनिटांतच आयोगाला कळू शकते व त्यावर गरज पडल्यास सुधारात्मक कृती करता येऊ शकते.

आपल्याकडे २०१४ ला झालेल्या निवडणूकीपासून सोशल मीडियाचे महत्त्व सर्वच राजकीय व्यक्ती आणि पक्षाच्या ध्यानात आल्याने या संवाद माध्यमांचा वापर खूप वाढला आहे. सोशल मीडिया सामाजिक आहे आणि त्यानुसारच त्याची शक्ती वापरली जावी. युवा मतदारांची वाढलेली जाणीव, जात, धर्म आणि वक्तृत्व यांच्या पलीकडे जाण्याची शक्यता आहे. अजून एक क्षेत्र तितकेच महत्त्वाचे आहे ते म्हणजे आरोग्यसेवा आणि सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न. हे असे क्षेत्र आहे जेथे मला वाटते की तरुण लोक अधिक कृतीसाठी सरकारकडे पाहत आहेत.

**डॉ. चंद्रकांत कुलकर्णी**/९९६०९६७१३२

## मोटारोला-अदानी

मोटारोला या अमेरिकन कंपनीची स्थापना १९२८ मध्ये झाली. १९७३ मध्ये कंपनीने जगातील पहिला हातात घेण्याजोगा मोबाईल फोन बनविला व लवकरच जगावर आपले साम्राज्य प्रस्थापित केले. १९९८ मध्ये नोकियाने मोटारोलाला मागे टाकून प्रथम क्रमांक मिळविला.

मोटारोलाने पेजर बनविला व १९७८ पर्यंत तो जगात अग्रेसर होता-पण जपानमध्ये नाही. जपानमध्ये निप्पोन टेलिग्राफ आणि टेलिफोन या सरकारी संस्थेचा एकाधिकार होता व तिने जपानी कंपन्यांना गैरजपानी माल आयात करण्यास मज्जाव केला. मोटारोलाला तर तो प्रचंड जपानी बाजार खुणावत होता पण अनेक प्रयत्न करूनही जपानपुढे डाळ शिजत नव्हती. वास्तविक मोटारोला तांत्रिकदृष्ट्या जपानी उत्पादनांपेक्षा सरस होता, पण जपानी लोकांचे व सरकारचे स्वदेशीचे प्रेम आड येत होते. मोटारोलाने दहा वर्ष सतत संघर्ष केला, सरकारी स्तरावर हा प्रश्न नेला. अमेरिकन सरकारने जपान सरकारशी उच्च पातळीवर चर्चा केल्या परंतु जपान अडेल राहिले. त्या काळात गृहमंत्री जॉर्ज शुल्ट्झ यांनी वैयक्तिकरीत्या मध्यस्थी केली व थोडे का होईना यश मिळाले. त्या चर्चेदरम्यान शुल्ट्झ सतत मोटारोलाच्या जपान एक्सपर्टशी संपर्कात राहात होते. १९८७ मध्ये अमेरिकेच्या हस्तक्षेपामुळे जपानच्या काही भागात मोटारोलाच्या पेजर विक्रीला परवानगी मिळाली.

१९९३ मध्ये अमेरिकेचा जपानशी व्यापारी तोटा ६० बिलियन डॉलरवर गेला. जुलै १९९३ मध्ये अध्यक्ष क्लिंटनने जपानचा दौरा केला, बोलणी फिसकटली. मग संतापून फेब्रुवारी १९९४ मध्ये क्लिंटनने जपानवर व्यापारी निर्बंध लादण्याची धमकी दिली-मोटारोलाला एंट्री दिली नाही तर. हा मात्र जमालगोटा ठरला व नंतर जपान हळूहळू वठणीवर आले. मुद्दा हा की एका कंपनीसाठी सरकारने एवढे टोकाचे पाऊल उचलले. आता जरा आपल्या अदानी -अंबानींकडे पाहा. अदानी-अंबानीच नव्हे तर सध्या भारतातल्या बहुतांश बड्या कंपन्यांना मोठे केले ते काँग्रेसनेच, कारण स्वातंत्र्यानंतर अनेक वर्ष काँग्रेसचीच सत्ता होती. विदेशी कंपन्यांना मोठमोठे ठेके देण्यापेक्षा आपल्याच भारतीय कंपन्यांना दिले तर त्यांना अनुभव मिळेल व त्या अधिक मोठ्या होऊन त्यांना जागतिक स्तरावर मान्यता मिळेल, असा विचार जर सरकारने केला तर त्यात काय चुकले?

असे बघा एका कंपनीचा - मोटारोलाचा - अधिक विस्तार व्हावा, त्या कंपनीला जपानचा बाजार खुला करून द्यावा या उद्देशाने अमेरिका सरकारी स्तरावर प्रयत्न करते व जेव्हा ध्येय साध्य होत नाही हे लक्षात आले तेव्हा साक्षात अमेरिकन अध्यक्ष त्यासाठी आर्थिक निर्बंध लादण्याचे टोकाचे पाऊल उचलण्याची धमकी देतो. जगातील सर्व विकसित राष्ट्रांची सरकारे आपल्या कंपन्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभी राहतात कारण त्यात त्या राष्ट्रांचा फायदा व सन्मान असतो. लोकांची सरकारकडून हीच अपेक्षा असते. तर आपल्याकडे आपले करंटे भारतीय विरोधी पक्ष मात्र अदानी-अंबानीविरुद्ध आणि सरकारविरुद्ध (खरे तर मोदींविरोधात) त्यासाठी बोंबा मारतात. याला राष्ट्रविरोधी म्हणतात.

**सुभाष कौशिककर**/९१६८८८०१५१

## ताकाला जाऊन भांडे लपविणे

उबाठा नेते आदित्य ठाकरेंनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर तिसऱ्यांदा भेट घेतली असे वाचण्यात आले. प्रथम उबाठा पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासोबत नागपूर हिवाळी अधिवेशनात एकत्रितपणे फडणवीसांना शुभेच्छा देण्यासाठी त्यांच्या कार्यालयात भेट घेतली होती. त्यावेळी त्यांनी आपण लोकांसाठी विरोधक आणि सत्ताधारी यांनी एकत्रितपणे काम करायला हवे, अशी भूमिका घेऊन भेट घेतली असे बोलले होते. त्यानंतर आता परत एकदा तिसऱ्यांदा त्यांनी मुंबईतील विविध भागांतील समस्यांसाठी ही भेट घेतली. या वेळी मोकळ्या मनाने इथे आलो आणि मुंबईतील समस्यांबाबत मुख्यमंत्र्यांची भेट घेतली असे बोलून दाखविले.

या सगळ्यांवर शिवसेना पक्ष प्रमुख आणि माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची जी प्रतिक्रिया वाचण्यात आली, "एवढ्या लवकर रंग बदलतील असं वाटलं नव्हतं." वस्तुस्थितीला धरून आणि त्यांची कानउघडणारी आहे. गेली अडीच वर्षे आदित्य ठाकरे घटनात्मक पदावर असलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबद्दल त्यांच्या प्रणीत सरकारला आणि त्या सोबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावाने वाट्टेल ते बोलत असत. आदित्य ठाकरे यांच्या प्रतिक्रिया सर्वसामान्य माणसाला ऐकवत सुद्धा नसत. त्यामध्ये सातत्याने घटनाबाह्य सरकार, घटनाबाहय मुख्यमंत्री, पन्नास खोके एकदम ओके तर उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना फडतूस म्हणणे, एक तर तू तरी राहशील नाही तर मी तरी राहील अशी टोकाची भाषा काढली होती.

उद्धव ठाकरे यांच्या पक्षाकडे आज कोणतेच स्थायी घटनात्मक पद नाही. सध्या विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेतेपद उद्धव ठाकरेंकडे असले तरी काँग्रेसचे सर्वाधिक विधान परिषद सदस्य असल्याने त्यांनी विधान परिषद विरोधी पक्षनेते पदासाठी त्यावर दावा ठोकण्याची भाषा सुरू केली आहे. विधानसभेतील मुख्य विरोधी पक्ष पद सध्या रिक्त असून नियमांनुसार आवश्यक संख्या बळ निवडणुकीत महाविकास आघाडीमधील कोणत्याच घटक पक्षाकडे नसल्याने त्यातल्या त्यात शिवसेना उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचे सगळ्यात जास्त म्हणजे २० आमदार निवडून आले असल्याने त्यांनी त्यावर आपला दावा ठोकण्याची भाषा सुरू केली. पण हे तेव्हाच शक्य आहे, जेव्हा विधानसभा अध्यक्ष आपला विशेष अधिकार वापरतील. मध्यंतरी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी म्हटले होते की विरोधी पक्षनेते पदासाठी कोणत्याही पक्षाकडून अद्याप अर्ज आला नाही.

आपण लोकांसाठी विरोधक आणि सत्ताधारी यांनी एकत्रितपणे काम करायला हवे, असे उद्धव ठाकरे गटाचे आदित्य ठाकरे कितीही दावा करत असले तरी त्यांची धडपड कशासाठी सुरू आहे ते आता लपून राहिले नाही. याला ताकाला जाऊन भांडे लपविणे असे म्हणतात.

**अविनाश देशपांडे**/पुणे

## फातिमा शेखच्या उदात्तीकरणाचे कारण काय?

आपल्या देशात अनेक वर्षांपासून काही स्वयंघोषित विद्वान मंडळींच्या टोळ्या चुकीच्या गोष्टी, खोटे नॅरेटिव्ह किंवा चुकीच्या ऐतिहासिक घटना समाजात प्रस्थापित करून संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतात. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश अर्थात ख्रिश्चनांनी आणि देश स्वतंत्र झाल्यानंतर देशातील काही तथाकथित लेखक डावे विचारवंत, कम्युनिस्ट, छुपे नक्षल समर्थक, ढोंगी पुरोगामी यांनी देशात खोटा इतिहास प्रस्थापित करण्याचा सतत प्रयत्न केलेला आहे. अकबर ग्रेट, हिंदू-मुस्लिम ऐक्याचा प्रतीक औरंगजेब, टिपू सुलतान यांचे आक्रमक मुस्लिम नव्हे तर मोगल बादशहा असे उदात्तीकरण करून इतिहासाचे विकृतीकरण केलेले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवकालीन इतिहासाची मोडतोड, संभाजी राजेंची हत्या व गुढीपाडव्याचा संबंध संत तुकाराम महाराज यांची हत्या, शनिवारवाडा पेशवाईमधील अमानुष प्रथा व म .फुले यांचा छळ, आर्य बाहेरून आले असे अनेक विषय समाजात संभ्रम निर्माण करण्यासाठी किंवा सामाजिक तेढ निर्माण करण्यासाठी पेरले गेले व प्रस्थापित केले गेले आहेत. आता फातिमा शेख यांचे काल्पनिक पात्र उभे करून समाजात प्रस्थापित करण्याचा प्रयत्न सुरू आहे. फातिमा शेख यांचे शिक्षणतज्ञ व समाज सुधारक असे खोटे कथानक व धादांत खोटी प्रतिमा उभी करण्यात येत असून म. जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या त्या सहकारी होत्या असे उदात्तीकरण करण्याचा प्रयत्न सुद्धा सुरू आहे.

महाराष्ट्रात काही वर्षांपूर्वी समाज सुधारक सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून त्यांचे स्मरण करताना हळूच फातिमा शेख यांचे काल्पनिक कथानक व पात्र समाजाच्या समोर उभे करण्यात आले होते. आता तर फातिमा शेख यांना सावित्रीबाई फुले यांच्यामध्ये बसविण्याचा घाट घातला जात आहे तसेच समाजात संभ्रम निर्माण करण्याचे फार मोठे षडयंत्र रचले जात आहे. कर्नाटक सरकारने फातिमा यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पुरस्कार सुद्धा जाहीर केला आहे. फातिमा शेख यांचा कोणताही समकालीन ऐतिहासिक पुरावा नाही किंवा म. फुले यांच्या साहित्यामध्ये नोंद नाही तरी सुद्धा ९ जानेवारीला फातिमा शेख यांची काल्पनिक जयंती साजरी करण्याचा घाट घालून कॉलेजमध्ये, सेमिनार, परिसंवाद व मोठे उत्सव साजरा करण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे.

सावित्रीबाई फुले यांचे पुण्यस्मरण करताना काल्पनिक फातिमा का उभी केली जाते याचा विचार करण्याची आवश्यकता आहे.

**अशोक राणे**/९४२३६५८३८५

रविवारची पत्रे व वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# लातूर जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## 'महाराष्ट्र फार्मसी'त विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन प्रोग्राम साजरा

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१९ जानेवारी -**

महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसी निलंगा येथे महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे अध्यक्ष विजय पाटील निलंगेकर याच्या मार्गदर्शनाखाली प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी दि.१८ जानेवारी रोजी फ्रेशर्स पार्टी व इंडक्शन प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले होते.

प्रथम वर्ष बी.फार्मसी, एम.फार्मसी व डायरेक्ट सेकंड इयर बी.फार्मसी या विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभासाठी सदरील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एस. पाटील प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र

पॉलिटेक्निक डी.फार्मसीचे प्राचार्य डॉ.बी.एन. पौळ, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ.एस.व्ही. उसनाळे, डॉ. एस व्ही. गरड, डॉ.सी.व्ही पांचाळ व पालक प्रतिनिधी म्हणून प्रशांत राघो हे मंचावर उपस्थित होते.

कार्यक्रमास प्रथम वर्षातील सर्व विद्यार्थि तसेच ४२ पालक या कार्यक्रमास उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नंदा भालके व प्रा. सानुली पोळकर तथा आभार प्रदर्शन प्रा. प्रीती माकने यांनी केले.

### दारूबंदी अधिकारी फरार...

# देवणी तालुक्यातून अवैध दारुची विक्री जोरात

**तभा वृत्तसेवा / प्रताप कोयले**
**देवणी, दि.१९ जानेवारी -**

तालुक्यातील अवैध दारू विकृत्याचे दारूबंदी अधिकारी यांना घरपोच हप्ते जात असल्याने देवणी तालुक्याकडे संबंधित दारूबंदी अधिकाऱ्यांनी देवणीकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष केल्याने सदर अधिकारी एकवर्षापासून एकही अवैध दारू विक्रत्यावर कारवाई केली नाही. अवैध दारू विक्री देवणी शहरासह देवणी तालुक्यात घरारातून होत आहे.

तालुक्यात अनेक गावातील महिलांनी ग्राम सभा घेऊन ग्राम सभेत दारूबंदी करण्याचा ठराव घेऊनही दारूबंदी अधिकारी व पोलीस प्रशासन यांच्यात आर्थिक संगनमत असल्याने कोणत्याच गावची अवैध दारु विक्री बंद झाली नसल्याने अनेक लोकांची घरे देशोधडीला लागले आहेत.

संबंधित दारूबंदी अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी महिला व जनतेतून होत आहे. दारू विक्री करणाऱ्या अधिकृत दुकानदारांना काही नियम घालून दिले आहेत. त्या नियमाचे उल्लंघन करून सर्रास सकाळ पासून संध्याकाळ पर्यंत वेळेची मर्यादा न ठेवता सर्व नियम धाब्यावर बसवून सकाळी चार ते संध्याकाळी एक दोनपर्यंत देशी दारू दुकान व शहरातील बार चालू आहेत यांच्याकडून वेळो वेळी चिरीमिरी घेऊन अर्थपूर्ण व्यवहार केले जात आहे.

दारू बंदी अधिकारी कोठे आहेत? कळवा हजार रुपये मिळवा असे लोकांना म्हणावे लागत आहेत. दारूबंदी अधिकारी यांचे नेमके अधिकार व काम काय? आहेत. हे येथील नागरिकांना पडला आहे. दारू बंदी




अधिकाऱ्यांनी अनधिकृत दारू विकणाऱ्यावर कारवाई केली आहे. याचा लेखा जोख देवणी तालुक्यातील जनतेला दारूबंदी अधिकारी यांना द्यावा लागणार आहे. म्हणून देवणी तालुक्यातून दारूबंदी अधिकारी एक वर्षापासून फरार, अवैध दारू विक्री होते दारोदार, दारू बंदीसाठी महिला ग्रामसभा घेतात.

अनेक बार पोलिस प्रशासन म्हणते हम क्या करेंगे यार आणि दारू बंदी अधिकारी हप्ते घेतो. वारंवार अनेकांचे संसार बरबाद, अशी अवस्था देवणी तालुक्यातील झालेली आहे.

## वाहकास दोन भावांची बेदम मारहाण; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१९ जानेवारी -**

औसा आगाराची रात्री मुक्कामी जाणारी औसा-बिरवली बस (क्र.एमएच.१४/बीटी १४९८) सायंकाळी आठ वाजता औशाहुन निघाली आणि कोरंगळा गावाजवळ आली. या बसमध्ये प्रवासी असलेले शिखरे व वाहक व यांच्यात किरकोळ कारणावरून वाद झाला. आरोपीने आपल्या भावास बोलवून घेऊन वाहक युवराज कांबळे यांना बसमधुन खाली खेचून जबर मारहाण करून जखमी केल्याचे घटना गुरुवार दि.१६ रोजी रात्री घडली आहे. या प्रकरणी भादा पोलिसात दोन भावाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तालुक्यातील कोरंगळा गावाजवळ आल्यावर बसच्या वाहकाने आरोपीस नीट बस म्हटल्यावर आरोपीने वाद घालण्यास सुरुवात केली आणि आपल्या सख्खा भावास बोलावून घेतले. भाऊ आल्यानंतर या वादांचे रूपांतर हाणामारीत होऊन वाहकास जब्बर जखमी केले आहे.

याप्रकरणी भादा पोलिसात चालक रमाकांत विश्वनाथ जेवळीकर यांच्या फिर्यादीवरून करण बाबुराव शिखरे व अर्जुन बाबुराव शिखरे कोरंगळा यांच्या विरोधात भादा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## रक्तदान महायज्ञाचे आमदारांच्या हस्ते उद्घाटन

### रक्तदान करुन सुरुवात; २०० जणांनी केले रक्तदान...



**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१९ जानेवारी -**

जगद्गुरू रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्य महाराज यांच्या कृपाआशीर्वादाने जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या वतीने १ लक्ष रक्त बॉटल्स संकलित केल्या जात आहे. या स्तुत्य उपक्रमाअंतर्गत औसा ग्रामीण रुग्णालयात रक्तदान महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी आमदार अभिमन्यू पवार यांनी रक्तदान करून रक्तदान महायज्ञाचे उदघाटन केले. यावेळी २०० हून अधिक लोकांनी रक्तदान केले.

राज्यातील रक्ताचा तुटवडा लक्षात घेऊन जगद्गुरू रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या संस्थानने रक्तदान महायज्ञाच्या माध्यमातून रक्तदात्यांकडून १ लक्ष बॉटल्स रक्त संकलित करण्याचा संकल्प केला आहे. या उपक्रमाअंतर्गत ८३ हजार बॉटल्स रक्त संकलित करण्यात आले. याच उपक्रमाचा भाग म्हणून औसा ग्रामीण रुग्णालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी भाजपा शहराध्यक्ष सुनील उटगे, रोहयो तालुका अध्यक्ष सदाशिव जोगदंड, बाजार समितीचे संचालक विकास नरहरे, तुकाराम गुडले, बल्लाळनाथ शिंदे, कृष्णा पांचाळ, कण्टेआण्णा मुळे, प्रा. शिवरुद्र मुर्गे, ॲड. योगेश शिंदे, सागर भंडारी व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

शिबीर यशस्वीतेसाठी संजय उजळंबे, गणेश बिराजदार, साधना पवार, तुलशीदास मलवाड, रत्नाकर पोतदार, साधु चाफेकर, मदार शहा, किरण शालगर, संतोष वर्मा, पांडूरंग वैजवाडे, सुभाष जाधव, साळुंके, शुभम शालगर, अक्षय झिरमिरे, मानसिंग जमादार, रोहित वैजवाडे यांनी पुढाकार घेतला. यावेळी पहिले रक्तदान आ. पवार केले यानंतर सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिकांनी रक्तदान केले.

## विमा व अतिवृष्टी अनुदान तात्काळ द्यावे अन्यथा तीव्र आंदोलन : प्रा. मिरगाळे

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१९ जानेवारी -**

स्टेट बँक ऑफ इंडिया एग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनीच्या माध्यमातून मागील वर्षापासून विमा कंपनी शेतकऱ्याचा विमा भरून घेते व अतिवृष्टी झाली तर ७२ तासाच्या आत नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना पिकविमा कंपनीस कळवणे बंधनकारक आहे. परंतु सदरील विमा अद्यापही प्राप्त झाला नाही. विमा अतिवृष्टी अनुदान तात्काळ द्यावे, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा प्रा. मिरगाळे यांनी दिला आहे.

शेतकऱ्यांनी वेळेत कंपनीला कळवल्यानंतर कंपनी पंधरा दिवसांच्या आत पंचनामा करणे आवश्यक आहे व पंचनामा केल्यानंतर पंधरा दिवसाच्या आत शेतकऱ्यांना पिकविमा देणे बंधनकारक असताना सुद्धा खरीप २०२३ चा आग्रीम २५ टक्के विमा ८० टक्के शेतकऱ्यांना आजतागायत मिळालेला नाही व खरीप २०२४ चे विमा पंचनामे होऊन दोन महिने झाले असताना सुद्धा विमा कंपनी शेतकऱ्यांना विमा देत नाही याचे नेमके कारण काय? प्रशासनाचे विमा कंपनीवर अंकुश नाही काय? विमा कंपनी व शासन यांच्यामध्ये करार झालेल्या अटी व शर्तीनुसार विमा कंपनी पालन का करत नाही? यावर प्रशासनाने कंपनीवर आजतागायत कार्यवाही का करत नाही? विमा कंपनी मनमानी कारभार करत असून शेतकऱ्यांना जसे ७२ तासाच्या



आत पिकविमा कंपनीला नुकसान कळवणे बंधनकारक आहे तसे पंचनामा झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे का पडत नाहीत? किंवा पिक विमा कंपनी पैसे का देत नाही याचे कारण अद्याप पर्यंत कळायला तयार नाही. पिक विमा कंपनीचे कोणाशी संगणमत आहे का? अशा बेजबाबदार वागणाऱ्या कंपनीवर प्रशासनाने कायदेशीर कार्यवाही करावी, अशी मागणी केली आहे. शासनाने तात्काळ अनुदानाचे पैसे शेतकऱ्याच्या खात्यात वर्ग करावे अन्यथा शिवसेना व युवासेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख प्रा. अण्णासाहेब मिरगाळे यांनी तहसीलदारांना दिला आहे.

यावेळी पांडुरंग लादे, तुकाराम यादव, बालाजी मिरगाळे, मनोज बेलकुंदे, धोंडदेव उपस्थित होते.

## अ.भा. मराठी नाट्य परिषद उदगीर शाखेची कार्यकारणी जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१९ जानेवारी -**

येथील अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा उदगीरच्या कार्यकारणीची घोषणा झाली आहे.

यामध्ये अध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर, उपाध्यक्ष (प्रशासन) प्रा. महेश बसपुरे, उपाध्यक्ष (उपक्रम) अश्विनी निवर्गी, प्रमुख कार्यवाह प्रा.डॉ. गौरव जेवळीकर, कोषाध्यक्ष अमित आग्रे, सहकार्यवाह डॉ. संजय कुलकर्णी, शिवकुमार डोईजोडे, रसूल पठाण यांची तर कार्यकारणी सदस्य म्हणून प्रा. रामकिशन सोनकांबळे, धनंजय गुडसूरकर, रामदास केदार, रमेश पवार, प्रा.डॉ. किरण गुट्टे, ॲड. बालाजी वलांडीकर, डॉ. कालिदास बिरादार, डॉ. स्मिता लखोटिया, प्रा. वंदना बांसवाडकर, दीपिका पाटील, हर्षदा भारती यांची निवड करण्यात आली. सल्लागार समिती सदस्य म्हणून प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, प्रा. महादेव गंदीगुडे, राम मोतीपवळे, डॉ. भाग्यश्री घाळे, गोपाळ जोशी, ड. व्यंकट मोरे, ईश्वरप्रसाद बाहेती, सुरेश देबडवार, बालाजी मुस्कावाड, विजयकुमार चवळे,





ॲड. महेश मळगे यांची एकमताने निवड करण्यात आली आहे.

## रौप्य महोत्सवी सोहळयानिमित्त भागवत ज्ञानयज्ञ सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.१९ जानेवारी -**

रेणापुर तालुक्यातील दर्जी बोरगाव येथे श्री. सदगुरु चिन्मयानंद स्वामी महाराज यांच्या समाधी १०१ रौप्य महोत्सवी सोहळ्याचे आयोजित सोहळयानिम्मीत दि.२३ ते ३० जानेवारीपर्यंत भागवत कथा ज्ञानयज्ञ आणि अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.



दरवर्षी प्रमाणे याही वर्षी दर्जी बोरगाव येथे श्री सदगुरु चिन्मयानंद स्वामी समाधी सोहळा साजरा होत आहे. दि.२३ जानेवारीपासून कथा प्रवक्ता हभप. भागवताचार्य श्री पुरुषोत्तम महाराज पाटील (बुलढाणा) यांची भागवत कथा होणार आहे. दैनंदीन कार्यक्रमात विष्णु सहस्त्रनाम, हभप. माऊली महाराज इके व दामोदर महाराज यांचे चिन्मयानंद स्वामी यांचे जीवन चरित्र पारायण सोहळा, दुपारी भागवत कथा, सायंकाळी हरिपाठ, किर्तन, जागर, काकडा भजन, असे धार्मीक कार्यक्रम होतील.

दि.२३ जानेवारीपासून अनुक्रमे हभप. प्रकाश महाराज साठे, हभप. उमेश महाराज दशरथे, हभप. नामदेव महाराज लबडे, हभप. पुरुषोत्तम महाराज पाटील, हभप. ज्ञानेश्वर महाराज पठाडे, हभप. अनिल महाराज पाटील, हभप. अक्रुर महाराज साखरे यांचे दररोज रात्री ८ ते १० पर्यंत किर्तन सेवा होणार आहे.

तर दररोज रात्री १० ते १ या वेळेत संगीत भजन होणार आहे. गुरुवार ३० जानेवारी रोजी सकाळी कै. लिंम्मनआप्पा हलकुडे स्मरणार्थ श्रींचा अभिषेक सकाळी १० ते १२ हभप. जयवंत महाराज बोधले पंढरपूर यांचे काल्याचे किर्तन तर समस्त ग्रामस्थ मंडळीच्या वतीने महाप्रसादाने सांगता श्रींच्या समाधी सोहळयानिम्मीत आयोजित सर्व कार्यक्रमास सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा, असे देवस्थान समिती व गावकरी मंडळाच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

## तोंडार येथे रस्ता सुरक्षा अभियान

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१९ जानेवारी -**

राज्य रस्ता सुरक्षा अभियान २०२५ अंतर्गत प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण व सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी आशिष कुमार अय्यर यांच्या मार्गदर्शनाखाली माऊली होमिओपॅथी कॉलेज व संशोधन संस्था, तोंडार उदगीर येथे केंद्रीय रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा विषयी जागृतीपर मार्गदर्शन करण्यात आले.

## व्यापाऱ्यांनी दुकानासमोर कॅमेरे बसवावेत : सपोउ. रेड्डी

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.१९ जानेवारी -**

चाकूर पोलीस स्टेशन येथे शहरातील व्यापारी यांची पोलीस प्रशासनाच्या वतीने दि.१८ जानेवारी रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी व्यापाऱ्यांच्या विविध समस्या जाणून घेण्यात आल्या. त्यानंतर सहायक पोलीस उपअधीक्षक बि.चंद्रकांत रेड्डी यांनी व्यापारी यांना एक कॅमेरा पोलिसांसाठी बसवावा, असे अहवान करण्यात आले. व्यापारी आणि पोलीस यांच्यात बैठकीत घेण्यात आली. व्यापारी यांनी विविध समस्या मांडल्या.

सदर बैठकीमध्ये व्यापाऱ्यांकडून आठवडी बाजारातील बेशिस्त, वाहनांची पार्किंग व्यवस्था, शहरातील बंद बडलेले सि.सि.टी.व्ही., शहरात रात्री पोलिसांनी पेट्रोलिंग वाढवावी, महाविद्यालयीन विद्यार्थीनींना रोड रोमीओचा व टवळखोरांचा त्रास, आठवडी बाजारातील हातगाडेवाल्यांचा त्रास, भाजीपाला बाजार मुख्यकमानीच्या आत भरवावा, मोबाईल चोरी, बोथी चौकातील ट्रॉफीकची व्यवस्था करावा आदी समस्यांच्या बाबतीत चर्चा केली. त्यामूळे एक कॅमेरा पोलिसांसाठी बसवण्यात यावा, असे आवाहन सहायक पोलिस उपअधीक्षक बि.चंद्रकांत रेड्डी यांनी केले. आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत व्यापाऱ्यांनी कॅमेरे बसवण्याचे मान्य केले.

बैठकीस पोनि. दत्तात्रय निकम, पोउपनि. राजेश घाडगे, पंकज निळकंठे, शहरातील प्रतिष्ठित व्यापारी उपस्थित होते.

# वलांडी बाजारपेठेतील मुख्य रस्ताच बनला पार्किंग झोन





### सतत रहदारीची कोंडी; पोलीस यंत्रणेची डोळेझाक...

**तभा वृत्तसेवा / रियाज मोमीन**
**वलांडी, दि.१९ जानेवारी -**

वलांडी (ता. देवणी) येथील मुख्य बाजारपेठेतील रस्त्यावर अतिक्रमण वाढल्याने मुख्य रस्त्याच पार्कींग झोन, आठवडी बाजारा दिवशी चारचाकी वहानांसह महिला व वृद्धांना कसत करावी लागते. अतिक्रमणासह मोबाईल चोरीच्या घटना व महिलांना त्रास होत असून बेशिस्त पार्कींग मात्र पोलीस प्रशासन या प्रश्नाकडे जाणीवपुर्वक डोळेझाक करीत असल्याने बाजारात खरेदी-विक्रीसाठी येणाऱ्या महिला, वृध्द ग्राहकांना अडचणीला सामोरे जावे लागत आहे. अनेकदा रस्त्यावर चारचाकी गाड्यांची रहदारीत रस्ता नसल्याने आमोरा समोर कोंडी होत आहे.

वलांडी ही तालुक्यातील सर्वाधीक मोठी बाजारपेठ असून परीसरातील तीस ते चाळीस गावांचा दैनंदिन व्यापारी संबंध असतो.

त्यातच आठवडी बाजारासह सणानिमीत्य खरेदीची मोठी झूंबड झाल्याने सतत वर्दळ वाढली आहे. मात्र गर्दीवर नियंत्रन ठेवणारी यंत्रना बेफीकीर झाल्याने सर्व सामान्याची चालतांनाही कोंडी होत आहे.

येथील बाजारपेठेतील मुख्य रस्त्यावरील रहदारीची कोंडीचा प्रश्न नेहमी उद्भवत आहे. शुक्रवारचा आठवडी बाजार, मुख्य रस्त्यावरील बेशिस्त रस्ता दुभाजक व्यापाऱ्यांची मुख्य रस्त्यावरच मांडलेली दुकाने यामुळे आठवडी बाजाराच्या दिवशी नागरीकांना चारचाकी वहाने गावात घेऊन येणे अत्यंत अडचणीचे झाले असून एखादी आपत्कालीन घटना घडल्यास जाण्यासाठी रस्ताही नसतो त्या मुळे भविष्यात होणारे आपत्कालीन धोके टाळण्यासाठी रहदारीस कठोर पायबंद पोलीस यंत्रनेने घालावे, अशी वलांडीकर करीत आहेत.

दैनंदिन व आठवडी बाजारातील समस्या नागरीकांसह महिला वर्गाची गर्दीतील कुचूंबना मोठ्या होत असून चारचाकी वहातूकीस अडथळा, मोबाईल चोरीच्या घटना घडूनही पोलीस प्रशासन या बाबीकडे जाणीपुर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप येथील नागरीक करीत आहेत.

### एकेरी मार्गावरच दुकाने लावावीत...

शुक्रवार हा आठवडी बाजाराचा दिवस असतो बाजारा दिवशी रस्त्याच्या दोन्ही बाजूला व्यापारी आपले दुकाने थाटतात. तर लहान सहान भाजीपाला व इतर विक्रेतेही आपली दुकाने याच मार्गावर लावतात. परिणामी आठवडी बाजारा दिवशी गावातून एखादी दुचाकी चालवणेही कठीण होत आहे. दरम्यानच्या काळात एखादी अंत्ययात्रा किंवा एखादा गंभीर रूग्न उपचारासाठी नेण्यास मोठा अडथळा होत आहे. त्यामुळे आठवडी बाजारात एकेरी मार्गावरच दुकाने लावण्याची व्यवस्था, करावी अशी नागरीकांची मागणी आहे.


## जाहिर नामा
### तालुका दंडाधिकारी
### तथा तहसीलदार चाकूर, यांचे कार्यालय
### (दंडणीय विभाग)

**जा.क्र.२०२४/एम.ए.जी./कावि-** **दिनांक १७/०१/२०२५**

**अर्जदार : श्री. झांबरे दत्तात्र्य विश्वनाथ रा. चाकूर, ता. चाकूर**

**विरुध्द**

**गैरअर्जदार :- मुख्याधिकारी नगर पंचायत/ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, चाकूर, ता. चाकूर**

**अर्ज : कलम १३ (३) जन्म-मृत्यु नोंदणी कायदा.**

याद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार **श्री. झांबरे दत्तात्र्य विश्वनाथ रा. चाकूर, ता. चाकूर, जि. लातूर** यांनी १३ (३) जन्म-मृत्यु कायदा अंतर्गत अर्जदार त्यांचा स्वताः **कु. झांबरे दत्तात्र्य विश्वनाथ** जन्म **दिनांक १०/०५/१९७४** रोजी राहत्या घरी झाला असून मुख्याधिकारी नगर पंचायत/ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय चाकूर, ता. चाकूर, जि. लातूर येथे जन्म नोंद नसल्याने त्यांच्या जन्म तारखेची नोंदणी मुख्याधिकारी नगर पंचायत/ग्राम सेवक, ग्रामपंचायत, कार्यालय चाकूर, ता. चाकूर, जि. लातूर येथे करणेकामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर जन्म तारखेच्या नोंदणीसाठी कोणच्याही कुठल्याही प्रकारचे आक्षेप अथवा हरकती असल्यास त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. सदर कार्यालयामध्ये कोणाच्याही आक्षेप अथवा हरकती प्राप्त न झाल्यास हे न्यायालय योग्य तो आदेश पारीत करेल. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा अथवा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही.

**दि. १७/०१/२०२५** **पुढील तारीख ०५/०२/२०२५**

**स्वाक्षरित /-**
**तालुका दंडाधिकारी, तथा तहसिलदार**
**तहसील कार्यालय, चाकूर**

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# दुर्बल, वंचीत घटकांपर्यंत कल्याणकारी योजना पोहचवा- न्या. सुर्यवंशी

## कळमनुरी येथे विविध शासकीय सेवा व योजनासंदर्भात महामेळावा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ जानेवारी**

शासनाच्या विविध कल्याणकारी योजना आदिवासी, दुर्बल, वंचीत घटकांपर्यंत पोहचत नाहीत. या योजनांची माहीती त्यांना व्हावी. त्यांच्या हक्क व अधिकाराची जाणीव त्यांना व्हावी, शासकीय कल्याणकारी योजना दुर्बल, वंचीतापर्यंत पोहचली पाहीजे हाच या महामेळाव्याचा प्रमुख उद्देश असल्याचे मत न्यायमूर्ती नितीन सुर्यवंशी यांनी यावेळी सांगितले.

कळमनुरी येथील जिल्हा परिषद शाळेच्या मैदानावर राज्य शासनाच्या विविध शासकीय सेवा व योजनांचा महामेळावा आणि अंमलबजावणी महाशिबिराचे रविवारी (दि. १९) मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाचे न्यायमूर्ती तथा जिल्हा पालक न्यायमूर्ती नितीन सुर्यवंशी यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी अभिनव गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, जल्हा विधी सेवा प्राधिकरण परभणीच्या अध्यक्षा उज्वला एम. नंदेश्वर आणि सचिव श्रीमती अर्चना तामणे यांच्यासह विविध विभागातील अधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना सुर्यवंशी म्हणाले की, प्रत्येकासाठी न्याय हे केवळ न्यायालयापुरतेच मर्यादीत नाही तर लोकांना त्यांच्या हक्क आणि अधिकाराबाबत जागृती करणे आहे. या महामेळाव्याच्या माध्यमातून नागरिक आर्थिक आणि न्यायापासून वंचीत राहू नये याबाबत जनजागृती केली जात आहे. समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळवून देणे तसेच कल्याणकारी योजनांच्या हक्क, अधिकार व फायद्याबाबत तसेच प्रशासकीय कार्यक्रम व उपाययोजनाबाबत अवगत करणे आहे. अशा लोकांना कायदेविषयक सेवा परवडत नाही अशांना जागरूकता प्रदान करणे तसेच कल्याणकारी योजनांच्या सेवांमध्ये जोडणे, प्रशासनाच्या इतर विभागातील योजना पात्र लोकांपर्यत पोहचल्या पाहीजेत असे मत यावेळी न्यायमूर्ती नितीन सुर्यवंशी यांनी व्यक्त केले.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण परभणी, तालुका विधी सेवा समिती हिंगोली आणि कळमनुरी तसेच जिल्हा प्रशासन परभणी आणि हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने हे महाशिबीर आयोजित करण्यात आले. या महामेळाव्याचा मुख्य विषय आदिवासी विकास आणि आरोग्य हा आहे. या व्यतिरिक्त समाजातील इतर दुर्बल, वंचित घटकांना शासकीय कार्यालयातील विविध लोककल्याणकारी योजनांची जनजागृती करणे, योजनांचा लाभ मिळविण्यासाठी कायदेविषयक मदत करणे हा या शिबिराचा उद्देश आहे. तसेच परभणी व हिंगोली जिल्ह्यातील विविध शासकीय व निमशासकीय विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या सेवा व योजनांची माहिती तसेच लाभ देण्यासाठी या महाशिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मान्यवरांनी महामेळाव्यात विविध विभागांमार्फत दुर्बल व वंचीत तसेच आदिवासींसाठी राबविण्यात येत असलेल्या कल्याणकारी योजंनाच्या स्टॉलला भेट देत प्रत्यक्ष माहीती घेतली. यावेळी मोठ्या संख्येने लाभार्थी, नागरिक, महिला यांची उपस्थिती होती.

# जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी नरहरी झिरवाळ यांची वर्णी

## आदिवासी बहुल जिल्ह्याच्या आशा पल्लवीत

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ जानेवारी**



राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांची हिंगोली जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी वर्णी लागली आहे. त्यांच्या निवडीमुळे आदिवासी बहुल जिल्हा असलेल्या जिल्ह्यातील जनतेच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. त्यांच्या वर्णीमुळे जिल्ह्यातील राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या पदाधिकाऱ्यांमध्ये आनंद व्यक्त होत असून मागास जिल्ह्यातील अनेक समस्या, अवैध धंदे, अवैध वाळू उपसा तसेच कायदा व सुव्यवस्था याचे मोठे आव्हान असणार आहे.

मागील अडीच वर्षाच्या काळात महायुतीच्या सरकारमध्ये हिंगोली जिल्ह्याचे पालकमंत्री पद तत्कालीन मंत्री अब्दुल सत्तार यांचेकडे होते. त्यांच्या काळात तत्कालीन शिवसेनेचे खा हेमंत पाटील आणि त्यांच्यात विकास कामाच्या निधीवरून चांगलीच खडाजंगी झाली होती. विकास कामात टक्केवारीच्या मुद्द्यावर जिल्हाभर चांगलीच चर्चा रंगली होती.

महाविकास आघाडी सरकारमध्ये तत्कालीन काँग्रेसच्या पालकमंत्री वर्षाताई गायकवाड यांना दोन-वेळा जिल्ह्याचे पालकमंत्रीपद मिळाले परंतु त्यांच्या काळातही विकासाला फारशी चालना मिळाली नाही. केवळ राष्ट्रीय सणाला झेंडावंदन करून आणि लांबलचक भाषणे करून त्यांनी त्यांचा कालावधी पार पाडला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारमध्ये आता हिंगोली जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची धुरा ही स्वच्छ प्रतिमेचे आणि आदिवासींच्या हितासाठी झगडणारे नरहरी झिरवाळ यांचेकडे सोपविण्यात आली आहे. त्यामुळे आदिवासी बहुल असलेल्या या जिल्ह्याला न्याय मिळेल अशी अपेक्षा आहे. जिल्ह्यात उद्योगधंदे नसल्यामुळे उच्चशिक्षणानंतर तरूण वर्ग परजिल्ह्यात कामाच्या शोधासाठी जात आहे. बेरोजगारी दूर करण्यासाठी हिंगोली सारख्या मागास जिल्ह्यात उद्योगधंदे आणून तरूणांच्या हाताला काम मिळणे अपेक्षित आहे. तरूणांना काम मिळाल्यास ते गुन्हेगारीकडे वळणार नाहीत.

जिल्ह्यात सध्या अवैध धंद्यावरून वर्चस्वाची लढाई दोन गटात चालू आहे. जिल्ह्यात अवैध धंद्यासह वाळू माफीया मोठ्या प्रमाणावर सक्रीय झाला आहे. त्यातून गोळीबार सारख्या तसेच दोन गटात गंभीर स्वरूपाची हाणामारीच्या घटना घडत आहेत. त्यावर अंकुश लावणे गरजेचे आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी राजकीय हस्तक्षेपाला चाप बसवावा लागणार आहे. पोलिसांना स्वतंत्रपणे काम करण्याची मुभाही द्यावी लागेल. याशिवाय जिल्ह्यात आदिवासी लोकांचे अनेक प्रश्न प्रलंबीत आहेत. त्यांनाही न्याय देण्याचे काम पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांना करावे लागेल. याशिवाय जिल्ह्याच्या विकासासाठी पालकमंत्री झिरवाळ यांना वेळोवेळी प्रशासनाच्या बैठका तसेच विकास कामांचा आढावा घ्यावा लागेल. केवळ राष्ट्रीय सणाला ध्वजवंदनासाठी न येता सर्वसामान्यांचे प्रश्न, अडचणी समजावून घेण्यात झिरवाळ काय करतील याकडे आता लक्ष लागले आहे.

# कुरूंदा मध्यवर्ती बँकेची तिजोरीच चोरट्यांनी पळविली

**तभा वृत्तसेवा**
**कुरूंदा, १९ जानेवारी**

वसमत तालुक्यातील कुरूंदा येथील जिल्हा मध्यवर्ती बँकेचे शटर उचकटून चोरट्यांनी त्यातील तिजोरीच पळविल्याची घटना रविवार दि १९ जानेवारी रोजी उघड झाली आहे. या तिजोरीमध्ये सात लाख रूपये असल्याचे सुत्रांकडून सांगण्यात आले आहे.या घटनेमुळे गावात एकच खळबळ उडाली असून वरिष्ठ पोलिस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आहेत. पोलिस परिसरातील सीसीटीव्हीच्या आधारे आरोपीचा शोध धेत आहेत.

याबाबत सुत्रांनी दिलेल्या माहीतीनुसार वसमत तालुक्यातील कुरूंदा येथे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बाजूलाच परभणी-हिंगोली जिल्हा मध्यवर्ती बँकेची शाखा आहे. शनिवारी दि १८ जानेवारी रोजी बँकेचे कामकाज आटोपून दिवसभरातील व्यवहाराची रक्कम बँकेत एका ओट्यावर असलेल्या तिजोरीमध्ये ठेवण्यात आली होती. त्यानंतर अधिकारी व कर्मचारी घरी निघून गेले.

दरम्यान चोरट्यांनी रात्रीच्या सुमारास बँकेचे शटर उचकटून आत प्रवेश केला. यावेळी चोरट्यांनी तिजोरी फोडून रक्कम नेण्याऐवजी चक्क तिजोरीच उचलून वाहनात टाकून पळविली. आज सकाळी बँकेचे शटर अर्धवट उघडे दिसल्यामुळे काही गावकऱ्यांनी पोलिस व बँक प्रशासनाला कळविले. वसमतचे उपविभागीय पोलिस अधिकारी राजकुमार केंद्रे, कुरूंद्याचे सपोनि रामदास निरदोडे, गुन्हे शाखेचे सपोनि शिवसांब घेवारे, जमादार बालाजी जोगदंड यांच्यासह पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. याशिवाय बँकेचे अधिकारी व कर्मचारीही दाखल झाले आहेत. या तिजोरीमध्ये सुमारे सात लाख रूपये असल्याचे बँकेकडून सांगण्यात आल्याचे सुत्रांनी सांगितले.

दरम्यान, चोरट्यांनी तिजोरी पळवितांना बँकेच्या आतील व बाहेरील सीसीटीव्ही कॅमेरे, डीव्हीआर देखील पळविला आहे. त्यामुळे बँकेत नेमके किती चोरटे घुसले होते किती जणांनी मिळून तिजोरी उचलली याचा अंदाज पोलिसांना घेता आला नाही. त्यामुळे पोलिसांच्या पथकाने आता कुरूंदा गावात येणाऱ्या मार्गावरील दुकानाच्या बाहेर असलेले सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे काम सुरू केले आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.



**हिंगोली- कळमनुरी येथे राज्य विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा विधीसेवा प्राधिकरण यांच्या संयुक्तविद्यमाने शासकीय सेवा य योजनांचा महामेळावा आणि अंमलबजावणी महाशिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आदिवासी विद्यार्थ्यांनी आदिवासी नृत्य सादर केले. याप्रसंगी व्यासपीठावर न्यायमूर्ती नितीन सुर्यवंशी, न्यायमूर्ती यनशिवराज खोब्रागडे, जिल्हाधिकारी अभिनव गोयल, न्यायधीश उज्ज्वला नंदेश्वर, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले आदींची उपस्थिती होती. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### आज हिंगोलीत महिला लोकशाही दिन

हिंगोली- राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला समान हक्क व समान संधी असा मूलभूत हक्क दिलेला आहे. त्याअंतर्गत समस्याग्रस्त व पीडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे. तसेच त्यांच्या तक्रारी, अडचणी यांची शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून जिल्हास्तरावर दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी किंवा तिसऱ्या सोमवारी सार्वजनिक सुट्टी असल्यास त्यानंतर येणाऱ्या कामकाजाच्या दिवशी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन राबविण्यात येतो. माहे जानेवारी, २०२५ च्या महिला लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार, (दि. २०) रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले आहे. समस्याग्रस्त व पीडित महिलांनी त्यांच्या अडचणी मांडण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, कक्ष क्र. एस-७, हिंगोली यांच्या कार्यालयात सादर करावेत. यामध्ये न्याय प्रविष्ठ प्रकरणे, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले, सेवा, आस्थापनाविषयक बाबी, तक्रार निवेदन वैयक्तिक स्वरुपाची नसेल असे अर्ज स्विकारले जाणार नाहीत. समस्याग्रस्त व पीडित महिलांनी शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या व्यासपीठाचा उपयोग आपल्या अडचणी सोडविण्यासाठी करावा, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, हिंगोली यांनी केले आहे.

### रामदास पाटील यांचा राष्ट्रवादी पक्षात प्रवेश



हिंगोली- विधानसभा निवडणुकीत भाजपचा राजीनामा देऊन अपक्ष निवडणुक लढविणारे माजी मुख्याधिकारी रामदास पाटील सुमठाणकर यांनी शिर्डी येथे झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. यावेळी नांदेडचे प्रताप पाटील चिखलीकर, वसमतचे आ. राजू नवघरे, जिल्हाध्यक्ष बी डी बांगर यांची प्रमुख उपस्थिती होती. रामदास पाटील यांच्या पक्ष प्रवेशामुळे हिंगोलीत राष्ट्रवादी पक्षाला निश्चितच ताकद मिळाली आहे. यावेळी प्रतिक्रीया देतांना रामदास पाटील म्हणाले की, येणाऱ्या काळात जिल्ह्यासह लोकसभा क्षेत्रात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मजबुत करणार असून तळागाळापर्यंत कार्यकर्त्यांना बळ देणार आहे. विकास कामांना चालना देणार आहे.

# पिसाळलेला कुत्रा पडलेल्या विहीरीतील पाणी पिल्याने गावकरी भयभीत, आरोग्य विभागाचे पथक दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ जानेवारी**



सेनगाव तालुक्यातील साखरा तांडा येथे गावातील पिसाळलेला कुत्रा विहीरीत पडला होता. गावकऱ्यांना याची माहीती नसल्याने याच विहीरीतील पाणी त्यांनी पिले. गावकऱ्यांना माहीती होताच गावकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण पसरले असून आरोग्य विभागाने शनिवारी रात्री उशिरापर्यंत १४७ गावकऱ्यांचे लसीकरण केले असून आणखी दोन डोस देण्याची तयारी सुरू केली आहे.

सेनगाव तालुक्यातील साखरा तांडा येथे मागील काही दिवसांपासून एक पिसाळलेला कुत्रा गावात फिरत होता. कुत्र्याच्या भितीमुळे गावकऱ्यांची झोपच उडाली होती. शालेय विद्यार्थी लहान मुले, महिला यांना घराबाहेर पडणेही कठीण झाले होते. त्यानंतर मागील दोन दिवसांपासून गावातील कुत्रा अचानक गायब झाला. कुत्रा गावातून निघून गेल्याचे गृहीत धरून गावकऱ्यांनी सुटकेचा निःश्वास सोडला होता. मात्र शनिवारी दि १८ जानेवारी रोजी गावकऱ्यांची पुन्हा एकदा झोप उडाली. गावातून गायब झालेला कुत्रा विहीरीच्या पाण्यावर मृतावस्थेत तरंगतांना दिसून आला. विशेष म्हणजे शुक्रवार आणि शनिवार या दोन दिवस गावातील अनेकांनी या विहीरीचे पाणी पिले होते. त्यामुळे गावकऱ्यात भितीचे वातावरण निर्माण झाले. या प्रकाराची माहीती आरोग्य विभागाला मिळताच जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ कैलास शेळके, तालुका आरोग्य अधिकारी डॉ सतीश रूणवाल यांनी तातडीने गावात लसीकरण शिबीर घेण्याच्या सुचना दिल्या. त्यानुसार साखरा तांडा गावात शनिवारी सायंकाळपासून लसीकरणाला सुरूवात झाली. वैद्यकीय अधिकारी डॉ गजानन कदम, आरोग्य कर्मचारी निवृत्ती महात्मे, प्रिती धबडगे, नंदा डवले, दिलीप हाके, राजू देवकते यांच्या पथकाने १४७ गावकऱ्यांवर लसीकरण केले. त्यासाठी हिंगोली, कापडसिंगी आरोग्य केंद्रातून लस उपलब्ध करण्यात आली. तब्बल तीन तास लसीकरण चालले आहे. त्यामुळे आता गावकऱ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे.

यावेळी डॉ कदम यांनी गावकऱ्यांचे समुपदेशन केले. गावाची लोकसंख्या ३००असून उर्वरित गावकऱ्यांचे लसीकरण केल्यानंतर आता मंगळवारी दि २१ जानेवारी रोजी दुसरा डोस तर शनिवार दि २५ तिसरा डोस दिला जाणार आहे.

# न.प.चे खेळाडू रवाना

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ जानेवारी**

छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या विभागीय स्तरीय क्रिडा व सांस्कृतीक स्पर्धेसाठी येथील नगर पालिकेचे कर्मचारी नुकतेच रवाना झाले आहेत. यावेळी सहायक आयुक्त अनंत जवादवार, हिंगोलीचे मुख्याधिकारी अरविंद मुंडे वसमतचे मुख्याधिकारी निलेश संकेवार, कळमनुरीचे मुख्याधिकारी रविराज दरक सेनगावचे मुख्याधिकारी गणेश गांजरे यांनी त्यांना शुभेच्छा देत रवाना केले. यावेळी टीम प्रमुख बाळु बांगर यांच्यासह विभागीय स्तरावर खेळणारे सर्व खेळाडू यांची उपस्थिती होती.

# गुरू पादेश्वर महाराज हल्लाप्रकरणातील दोघेजण ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ जानेवारी**

वसमत विधानसभा मतदारसंघात निवडणुकीतील उमेदवार गुरू पादेश्वर शिवाचार्य महाराज यांचय वाहनावर हल्ला करणाऱ्या दोघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने रविवारी दि १९ जानेवारी रोजी अटक केली आहे. गुरू पादेश्वर महाराजांना मतदारांची सहानुभूती मिळावी यासाठी हल्ला करण्यात आल्याची कबुली त्यांनी दिली आहे.

वसमत विधानसभा मतदार संघात गुरू पादेश्वर शिवाचार्य महाराज हे निवडणुक रिंगणात होते. निवडणुकीत प्रचाराच्यावेळी दि १९ नोव्हेंबर रोजी अनोळखी व्यक्तींनी त्यांच्या वाहनावर दगडफेक करून त्यांच्यावर हल्ला केला होता. यामध्ये ते जखमी झाले होते. या प्रकरणी वसमत ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील यांनी सदरील तपास गुन्हे शाखेकडे दिला होता. गुन्हे शाखेचे पोनि विकास पाटील यांनी सपोनि शिवसांब घेवारे, उपनिरीक्षक विक्रम विठूबोने, कपील आगलावे, जमादार प्रेमदास चव्हाण, गजानन पोकळे, कुमार मगरे, राजु ठाकूर, लिंबाली वाहुळे, आकाश टापरे, हरिभाऊ गुंजकर, विशाल खंडागळे, किशोर सावंत यांच्या पथकाने आरोपीचा शोध सुरू केला. दरम्यान या प्रकरणातील दोघे ग्रामीण पोलिस ठाण्याच्या हद्दीत एका गावात आल्याची माहीती पथकाला मिळताच आज पहाटे पथकाने भुजंग निरदोडे, संकेत भोसले रा मालेगाव जि नांदेड यांना अटक केली. त्यांची अधिक चौकशी केली असता नांदेड येथभल एका व्यक्तीने हल्ला करण्याचे सांगितले असून गुरू पादेश्वर महाराजांना सहानुभूती मिळावी या उद्देशाने हल्ला केल्याचे चौकशीत सांगितले. याप्रकरणात आणखी काही आरोपींचा शोध सुरू आहे.

# सांदीपनी पब्लीक स्कूलचे विविध स्पर्धात्मक परिक्षेत घवघवीत यश

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ जानेवारी**



सांदिपनी पब्लिक स्कूल, सुनिल मगर, नांदेड येथील शाळेने स्पर्धात्मक परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.

या शैक्षणिक वर्षात २०२४-२०२५ मध्ये आएमओ, एनएसओ, आयइओ, आयजीकेओ या स्पर्धात्मक परीक्षा नुकत्याच पार पडल्या. या स्पर्धात्मक परीक्षेत विद्यार्थ्यांनी अत्तुंग भरारी घेतली आहे. आयएमओ परीक्षेत १७० विद्यार्थ्यांपैकी २९ विद्यार्थ्यांना सुवर्णपदक मिळाले आहे. तसेच एनएसओ परीक्षेत २५ विद्यार्थ्यांना सुवर्णपदक मिळाले आहे, आयइओ परीक्षेत १६ विद्यार्थ्यांना सुवर्णपदक मिळाले आहे, आणि आयजीकेओ परीक्षेत ४ विद्यार्थ्यांना सुवर्णपदक मिळाले आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेकडून कौतुक करण्यात आले.

या यशाबद्दल शाळेचे संचालक सुनील राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, विपुल राठोड, सौ. रेश्मा विपुल राठोड, सौ. माहेश्वरी मुकुल राठोड, शाळेच्या मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका सौ. हरप्रीत कौर, प्रशासक मारुती मेखाले, गणिताचे शिक्षक आणि शाळेतील सर्व शिक्षक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

# शोभायात्रेत श्रद्धेचा महासागर; रस्त्यावर अवतरले गोकुळ!

## सजीव झांकी, घोडेस्वार, उंटस्वार, शाहिरी पथक, लेझीम, दांडिया, बाल वारकरी आणि मंगल वाद्यांच्या निनादाने आसमंत निनादला, स्वागत कमानी आणि ठिकठिकाणी झालेल्या पुष्पवृष्टीने रस्ते भक्तीरसाने न्हाले, शोभायात्रेतून अध्यात्म आणि श्रद्धेचा अनोखा संगम.

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

गोवत्स प. पू. राधाकृष्णजी महाराज यांच्या श्रीमद्भागवत कथा महोत्सवासाठी आज शनिवार दि. १८ जानेवारी रोजी बडी सडक येथील श्रीराम मंदिरासमोरून करण्यात आलेल्या शोभायात्रेने भक्ती आणि श्रद्धेचे अनुपम दर्शन घडवले. शोभायात्रेचा ठिकठिकाणी भव्य स्वागत कमानींनी सजवलेला मार्ग, पुष्पवृष्टी, रांगोळ्यांनी सुशोभित केलेले रस्ते आणि मंगल वाद्यांमुळे संपूर्ण शहर मंगलमय झाले होते.





याची देही याची डोळा, याप्रमाणे ही शोभायात्रा ऐतिहासिक ठरली.

शोभायात्रेची सुरुवात प. पू. राधाकृष्ण महाराज आणि मुख्य यजमान शिवरतन मुंदडा यांच्याहस्ते रामलल्लांच्या आरतीने झाली. सर्वात समोर कलशधारी महिला, त्यानंतर गोवत्स प. पू. राधाकृष्ण महाराज विराजमान असलेला रथ, सजीव झांकींचे २० रथ, उंटस्वार, घोडेस्वार, शाहिरी पथके, बाल वारकरी, लेझीम व दांडिया पथक, केरळी बँड, सजीव झांकींनी भक्तांच्या मनात अध्यात्मिक जिवंतपणा निर्माण केला. मंगल वाद्यांच्या निनादाने संपूर्ण शोभायात्रा भक्तिरसाने ओतप्रोत भरली होती. बडी सडक, नरिमान रोड, राजुरी कॉर्नर, संभाजीनगर आणि मुंडे चौक मार्गे ब्रजधामपर्यंत निघालेली शोभायात्रा भक्तीचा महोत्सव ठरली. शोभायात्रेत दर्शनासाठी रस्त्याच्या दुतर्फा उभ्या असलेल्या भाविकांच्या जय श्रीकृष्ण आणि हरि बोल च्या जयघोषाने आसमंत दुमदुमला. ठिकठिकाणी करण्यात येत असलेली पुष्पवृष्टी, भक्तांचा उत्साह आणि झांकींनी जालनेकरांच्या अंत:करणाला स्पर्श केला.

शोभायात्रेत भक्तीबरोबर सेवाभावाचा संगम दिसून आला. शोभायात्रा मार्गावर ठिकठिकाणी फराळ, चहा-पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. शोभायात्रेत प्रतिष्ठित मंडळी, राजकीय मंडळी, सर्व क्षेत्रातील मान्यवर, भाविक, नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.शोभायात्रेच्या निमित्ताने जालन्याच्या गल्लीबोळांत भक्तीचा मंगल गजर झाला. रथ, झांक्या आणि वाद्यांच्या गजरातील शोभायात्रेचे अनोखे रूप जालनेकरांनी अनुभवले. दररोज दुपारी १ ते सायंकाळी ५ या वेळेत राधाकृष्ण महाराजांची कथा होणार आहे.

श्रीमद् भागवत कथेचा भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीमद् भागवत कथा सेवा समिती आणि सनातन हिंदू समाजाच्यावतीने करण्यात आले आहे

---

## संक्षिप्त

### पिठोरी सिरसगावात दारू साठा जप्त

तभा वृत्तसेवा
अंबड/प्रतिनिधी

अबंड तालुक्यातील मौजे पिठोरी सिरसगाव येथे होत असलेल्या अवैध दारू अड्ड्यावर छापा टाकून गोंदी पोलीसांनी २ हजार ८०० रुपये किमतीच्या देशी दारूच्या ४० बॉटल जप्त केल्या आहेत. अवैध देशी दारू विक्रीची माहिती मिळताच बीट जमादार ज्ञानेश्वर बाबासाहेब कंटुले यांनी हरिचंद्र गंगाराम कांबळे रा. पिठोरी सिरसगाव यांच्या विरुद्ध कारवाई करत देशी दारूच्या ४० बॉटल जप्त केल्या आहेत. याप्रकरणी गोंदी पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारुबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुखापुरी पोलीस चौकीचे पोलीस उपनिरीक्षक पद्मणे हे करत आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक पद्मने, जमादार ज्ञानेश्वर कंटुले, जमादार हजारे यांनी केली. या कारवाईमुळे पिठोरी शिरसगाव येथील अवैध दारू विक्रीत्यांचे धाबे दणाणले आहे.




### महसूल विभागाच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा संपन्न

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

जालना जिल्हा महसूल विभागाच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धाचे आज येथील जिल्हा पोलीस मैदानावर आयोजन करण्यात आले होते. जालना जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल यांच्या हस्ते क्रिडा स्पर्धाचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांची उपस्थिती होती. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी रीता मैत्रवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, उप जिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, उपजिल्हाधिकारी सविता सुत्रावे यांच्यासह सर्व उपजिल्हाधिकारी सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदार तसेच सर्व कर्मचारी उपस्थित होते. आज पार पडलेल्या क्रीडा स्पर्धेत महसूल विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी विविध क्रीडा प्रकारांमध्ये आपला सहभाग नोंदवला. या क्रीडा स्पर्धांमधून उत्कृष्ट खेळाडूंची निवड करून सदर उत्कृष्ट खेळाडू हे आगामी फेब्रुवारीमध्ये होणाऱ्या विभागीय क्रीडा स्पर्धेत आपला सहभाग घेणार आहेत.

### सिद्धार्थ महाविद्यालयामध्ये ग्रंथ प्रदर्शन



तभा वृत्तसेवा
जाफराबाद/प्रतिनिधी

दिनांक १६ जानेवारी २०२५ येथील सिल्लोड शिक्षण संस्था छ. संभाजी नगर संचालित सिद्धार्थ कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय जाफराबाद या महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा व मराठी भाषा संवर्धन पंधरवडा यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथालय विभागात भव्य दिव्य असे ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते,या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देशमुख आर.टी यांच्या शुभहस्ते करण्यात आले आपल्या उद्घाटनपर भाषणात प्राचार्य डॉ देशमुख यांनी विद्यार्थ्यांनी वाचनाकडे लक्ष देणे आवश्यक आहे,वाचन हा व्यक्तीच्या आयुष्यात अविभाज्य घटक आहे विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त पुस्तके वाचावीत व आपले ज्ञान भांडार समृद्ध करावे असे आवाहन केले

कार्यक्रमाचं सूत्रसंचालन वाचन संकल्प महाराष्ट्राच्या या उपक्रमाचे समन्वय प्रोफेसर डॉ. विजय पाटील यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे समन्वयक प्रा. एस. टी. साळवे व्यक्त केलेत यावेळी महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ.एस. एल. मेढे,कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य विनोद हिवराळे प्रा. डॉ. कैलास पाटील प्रा. डॉ एस.डी.एरंडे,प्रा. डॉ एस. पी. जगतवाड, प्रा. अनिल वैद्य यांनी सहभाग नोंदविला विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेऊन वाचन संस्कृती संवर्धना बरोबरच भाषेचाही उत्कर्ष करू अशी हमी दिली. महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. अशोक पठाडे व त्यांचे सर्व सहकारी धनराज भिसे, गफार खान, दिलीप घुगे, कृष्णा ठोसर , अण्णासाहेब घोडके यांनी ग्रंथ प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

---

## २ महिन्यात ९५ गाव वॉटर च काम पूर्ण करा -आ.बबनराव लोणीकर

### महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या अधिकाऱ्यांसह कंत्राटदाराला सुनावले

तभा वृत्तसेवा
मंठा/प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील ९५ गाव वॉटर ग्रीड चे काम अद्याप पूर्ण झालेले नसताना देखील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण च अधिकाऱ्यांनी शासनाला चुकीची माहिती देऊन संपूर्ण बिल अदा केले आहे अशा परिस्थितीत कंत्राटदार कोणालाही जुमानत नव्हता त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे प्रधान सचिव सदस्य सचिव मुख्य अभियंता व लोकप्रतिनिधी म्हणून मी स्वतः कठोर भूमिका घेतली व त्यामुळे कंत्राटदार संपूर्ण काम करून देण्यास आज रोजी तयार झाला आहे अशा परिस्थितीत पुढच्या २ महिन्यात ९५ गाव वॉटर च काम पूर्ण करा अन्यथा कंत्राट दरासह खोटे बिल अदा करणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांच्या विरोधात कठोर भूमिका घेतली जाईल अशा शब्दात माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या अधिकाऱ्यांसह कंत्राटदाराला सुनावले.

वांजोळा येथील उद्धव विहिरीपासून मंठा येथील जलशुद्धीकरण केंद्र जलशुद्धीकरण केंद्रापासून मुख्य जल कुंभापर्यंत व मुख्य जल कुंभापासून गावातील पाण्याच्या टाकीपर्यंत पाणी पोहोचणे, या सर्व कामामध्ये हायड्रोलिक टेस्ट करणे, त्यानंतर ही योजना तीन वर्ष चालवने, त्यानंतर या योजनेचे बिल अदा करणे आवश्यक होते परंतु अधिकारी व कंत्राटदार यांनी



संगणमताने काम न करताच संपूर्ण बिल उचलले हा गंभीर स्वरूपाचा गुन्हा आहे तरीसुद्धा काम पूर्ण करून देण्याच्या अटीवर आपण कंत्राटदार व अधिकारी यांना एक संधी दिली आहे. काम पूर्ण न करता संपूर्ण बिल अदा करणाऱ्या अधिकाऱ्यांना व कंत्राटदाराला ही शेवटची संधी आहे त्यांनी सांगितलेल्या कालावधीत काम पूर्ण न केल्यास विधानसभेत प्रश्न उपस्थित करणार असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी आज मंठा येथे आयोजित आढावा बैठकीदरम्यान स्पष्ट केले महाराष्ट्र जीवन प्राधिकरण च्य अधिकाऱ्यांनीन मुख्य अभियंता म्हणून मला, सदस्य सचिव व प्रधान सचिव यांना दिलेली माहिती व प्रत्यक्ष आढावा बैठकीदरम्यान गटविकास अधिकारी व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती यामध्ये मोठ्या बील अदा केलेल्या तारखेपर्यंत हे काही गावात पाणी गेलेले नाही असेच स्पष्ट होत आहे. अधिकारी व कंत्राटदार यांनी काम पूर्ण करून देतो या अटीवर दोन महिन्यांचा वेळ मागितला आहे त्यामुळे नमूद वेळेत काम पूर्ण न केल्यास किंवा कामात गय करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल अशा शब्दात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या मुख्य अभियंता मनीषा पलांडे यांनी अधिकारी व कंत्राटदार यांना कडक शब्दात सुनावले. यावेळी महाराष्ट्र जीवन प्राधिकार्यांच्या मुख्य अभियंता मनीषा पलांडे तहसीलदार सोनाली जोंधळे कार्यकारी अभियंता श्री चव्हाण गटविकास अधिकारी श्री गगनबोने तालुकाध्यक्ष सतीशराव निर्वळ पंजाबराव बोराडे विलास घोडके आनंद जाधव विठ्ठलराव काळे रामकिसन बोडके नवनाथ खंदारे राजेभाऊ खराबे रावसाहेब बाहेकर माऊली गोंडगे कैलास चव्हाण गणेशराव चव्हाळ दिगंबर बोराडे परमेश्वर शिंदे पोपटराव खंदारे दत्ताराव कांगणे आबासाहेब सरकटे अशोक बोराडे बाबाजी जाधव दत्ता खराबे सचिन राठोड जानकीराम चव्हाण सोपान वायाळ शरद पाटील शिवशंकर डोईफोडे रामेश्वर इंगळे भगवान देशमुख रमेश वायाळ श्रीदेव खरात नामदेव बनसोडे प्रेम गोपाल कासट प्रभाकर जाधव राजू राठोड महादेव वायाळ जगदीश जाधव सुनील कांगणे जितेंद्र सरकटे विजय घाडगे प्रकाश मुळे बाळू चौडे प्रकाश गबाळे तानाजी शेंडगे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती

---



## बळीराजांचे हौशी मर्दानी खेळ म्हणजे बैलांचा शंकर पट -आकात

तभा वृत्तसेवा
मंठा/प्रतिनिधी

बळीराजाचा हौशी मर्दानी खेळ म्हणजे शंकर पट असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक जिल्हाध्यक्ष कपिल आकात यांनी केले. ते धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त आयोजित शंकर पट शर्यत कार्यक्रमाच्या उद्घाटनाप्रसंगी उद्घाटक म्हणून बोलत होते. हेलस येथील तरुणांच्या वतीने जालना-मंठा रोडवरील माऊली इंग्लिश स्कूलजवळ छत्रपती संभाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त भव्य जंगी शंकर पटाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमांमध्ये आकात बोलत होते.यावेळी एडवोकेट पंकज बोराडे, महेश नळगे,सतीश निर्वळ ,कल्याण खरात, कुणाल कमळकर , मधुकर काकडे, दीपक खराबे, नामदेव बनसोडे, गणेश खराबे, सुमित चव्हाण यांच्यासह आदींची उपस्थिती होती. या कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांचा सत्कार करून शंकरपटाचा शुभारंभ कपिल आखात व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी कपिल आकात यांनी उप-स्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी शंकर पटाचे अध्यक्ष भगवान खराबे , उपाध्यक्ष भागवत खराबे, सचिव विलास खराबे, सदस्य गणेश खराबे, पवन खराबे, कन्हैया वाघमारे यांच्यासह आदींनी परिश्रम घेतले.या बैलगाडा शर्यतीमध्ये जालना जिल्ह्यासह विविध जिल्ह्यातून शेतकऱ्यांनी आपली उपस्थिती दर्शवली होती.

---

## प्रत्येकाने अंध अपंग दिव्यांगांची सेवा करावी- मोहन अग्रवाल

तभा वृत्तसेवा
परतुर/प्रतिनिधी



लुई ब्रेल शिक्षण संस्था परतुर आयोजित येथील इंदिरा मंगल कार्यालय येथे दोन दिवसीय अंध अपंग दिव्यांगाच्या कार्यशाळेच्या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते ,या कार्यशाळेत पुने व मुंबईहून शिक्षक आले होते, ब्रेल लुई शिक्षण संस्थेने महाराष्ट्र राज्यात अंध अपंग साठी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्काराचे वितरणही शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल यांच्या हस्ते केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपा प्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख अग्रवाल व्यासपीठावरून बोलत होते, ते पुढे म्हणाले की मानव जन्म आहे जेवढी सेवा आपल्या हातून घडेल तेवढी सेवा मानवाने अंध अपंगाची करून घ्यावी. ब्रेल लुई शिक्षण संस्था संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शंकर राखुंडे यांनी आपल्या प्रस्ताविकामध्ये अंध अपंगांसाठी कॅम्पुटर प्रशिक्षण संस्था खोलण्यासाठी मदत करावी असे प्रास्ताविकात म्हंटले असता मोहन अग्रवाल यांनी लगेचच माझ्याकडून एक संगणक संच देतो असे या ठिकाणी जाहीर केले येथील शिक्षण संस्थाही दिव्यंग अंध अपंगांसाठी कार्य करीत असून मुंबई पुण्यासारख्या नागरिकांनी या संस्थेस भरभरून मदत देत आहेत तर परतुर येथील नागरिकांनी सुद्धा या संस्थेत भरभरून मदत करावी असेही मोहन अग्रवाल म्हणाले तसेच अंध अपंगासाठी दोन दिवसाची कार्यशाळा होती या कार्यशाळेत शिक्षक म्हणून मुंबई पुणे येथील मान्यवर शिक्षकांची हाजेरी होती. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल होते तर प्रमुख पाहुणे रेणु कोंडोलीकर अध्यक्ष दृष्टही कल्याण संघ पुणे, जाई खामकर संस्थापक अध्यक्ष मळगंगा अपंग सेवा संस्था पुणे, स्वरूपा देशपांडे सह शिक्षिका, भारडसर, सुनील खरात, दीपक सोळंके, नामदेव भालेराव, राजीव गिरी, सुवर्णा गजरे, शिवसेना शहरप्रमुख दीपक हिवाळे ,दीप्ती मॅडम, त्रिषाला आठवले, प्राध्यापक जोशी सर वादी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शंकर राखुंडे यांनी केले आभार रंजना राखुंडे यांनी केले कार्यक्रमाचा समारोप सामूहिक राष्ट्रगीताने केला.

---

देशासह विकसित महाराष्ट्राचा संकल्प पूर्ण करण्यासाठी

## भाजपाचे सदस्यत्व स्विकारुन भारतीय जनता पार्टीला पाठबळ द्या -माजीमंत्री रावसाहेब दानवे

तभा वृत्तसेवा
भोकरदन/प्रतिनिधी


पंतप्रधान मा.नरेंद्रजी मोदी यांच्या स्वप्नातील विकसीत भारत व मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस यांच्या स्वप्नातील विकसीत महाराष्ट्राचा संकल्प पूर्ण करण्यासाठी भाजपाचे प्राथमिक सदस्यत्व स्विकारुन भारतीय जनता पार्टीला पाठबळ द्यावे असे प्रतिपादन माजी केंद्रीय मंत्री श्री.रावसाहेब पाटील दानवे यांनी भोकरदन तालुक्यातील सोयगांव देवी येथे शुक्रवार दि. १७ जानेवारी २०२४ रोजी भाजपा सदस्य नोंदणी संघटन पर्व अंतर्गत घर चलो अभियानात केले. यावेळी मा. जि.प.सदस्य डॉ.चंद्रकांत साबळे, रामेश्वर सहकारी साखर कारखान्याचे संचालक दादाराव महाराज राऊत यांच्यासह भाजपाचे स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




भारतीय जनता पार्टीच्या सुरु असलेल्या संघटन पर्वा अंतर्गत भोकरदन तालुक्यात शुक्रवार दि. १७ जानेवारी २०२४ रोजी प्राथमिक सदस्य नोंदणीसाठी घर चलो अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या अभियाना अंतर्गत माजी केंद्रीय मंत्री श्री.रावसाहेब पाटील दानवे यांनी सहभागी होत ग्रामस्थांची ऑनलाईन पध्दतीने भाजपाचे प्राथमिक सदस्य म्हणुन नोंद करुन घेतली. भोकरदन तालुक्यातील सर्व गावामध्ये भाजपाचे घर चलो अभियान मोठ्या प्रमाणावर राबविण्यात आले असुन स्थानिक पदाधिकारी शेकडो कार्यकर्त्यांनी या अभियाना अंतर्गत नोंदणी केली. सदर अभियानास नागरीकांचा मोठा प्रतिसाद लाभला असुन हे अभियान यशस्वी करण्यासाठी गणेशबापु फुके, कौतीकराव जगताप, राजेंद्र देशमुख, आशाताई पांडे, तुकाराम जाधव, मुकेश चिने, गणेश पा.ठाले, परमेश्वर लोखंडे, मधुकर दानवे, दिपक जाधव कमलाकर साबळे, गजानन नागवे, मधुकर मुकुटराव, गजानन गावंडे यांच्यासह स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती

---

## जनतेची सेवा करून मतदारांचे ऋण फेडणार -आ.संतोष पाटील





तभा वृत्तसेवा
जाफ्राबाद/प्रतिनिधी

मतदार संघातील जनतेने आपल्याला भरघोस मतदान रुपी आशीर्वाद देऊन सलग तिसऱ्यांदा आमदार म्हणून निवडून दिल्याबद्दल आपण अविरतपणे जनतेची सेवा करूनच मतदारांचे ऋण फेडणार असल्याचे प्रतिपान आमदार संतोष पाटील दानवे यांनी भाजपा-महायुती आणि जाफ्राबाद तालुक्यातील समस्त नागरिकांच्या वतीने आयोजित भव्य नागरी सत्कार सोहळ्यात सत्कार स्वीकारतांना बोलत असतानी व्यक्त केले.

पुढे बोलताना आमदार संतोष पाटील दानवे म्हणाले की, गेल्या दहा वर्षाच्या काळात सर्वसामान्यांसाठी अविरतपणे काम करून रस्ते , वीज आणि पाणी या क्षेत्रामध्ये भरीव काम करून माजी केंद्रीय मंत्री श्री रावसाहेब पाटील दानवे साहेब यांच्या माध्यमातून केंद्र आणि राज्य सरकारकडून भरघोस निधी उपलब्ध करून मतदार संघाचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आणि त्याचेच फलित म्हणून आज जनतेने आपल्याला सलग तिसऱ्यांदा निवडून दिल्याचे ते म्हणाले.

निवडणूक काळात भाजपा महायुतीच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांची मेहनत, जनतेने दिलेली साथ आणि पत्रकार बांधव तसेच प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत करणाऱ्या सर्वांचेच त्यांनी यावेळी आभार मानले.

यावेळी शिवाजी बापू थोटे, विजय नाना परिहार,नाना भागिले, गजानन बापू नागवे, शालिकराम पाटील म्हस्के, संतोष पाटील लोखंडे, गोविंदराव पाटील पंडित, राजेश पाटील चव्हाण, दत्तू पाटील पंडित, भाऊसाहेब पाटील जाधव, साहेबराव कानडजे, दगडुबा गोरे, मधुकर पाटील गाढे, सौ. तारामती अवकाळे,दत्तू पाटील अंभोरे, दत्ता पाटील बंगाळे,गजानन पाटील घाटगे, सुधीर पाटील, तुळशीराम पायघन, साहेबराव लोखंडे, कडूबा शितोळे, दीपक पाटील वाकडे, विजय परिहार, रविराज जैस्वाल, अनिल बोर्डे, राजेश म्हस्के,संजय खंडेलवाल, अरुण अवकाळे, अमोल पडघन, मधुकर देठे, मनोज शिंदे, शेख कौसर, बालाजी पवार, राजू परिहार, गजानन लहाने आदींसह भाजपा महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

### जाहिर प्रगटन

**परतुर येथील तालुका दंडाधिकारी परतुर यांचे न्यायालयात**

अर्ज क्रमांक ८४८/२०२४

**अर्जदार: शुभम ज्ञानेश्वर थावरे**

**विरूध्द**

**गैरअर्जदार : ग्रामसेवक वैजोडा ता.परतुर**

प्रकरण :जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) अधिनियक २०२३ अन्वये कलम १३ (३) प्रमाणे अर्ज

ज्या अर्थी अर्जदार नामे शुभम ज्ञानेश्वर थावरे वय १९ वर्ष धंदा -रा.वैजोडा ता.परतुर जिल्हा जालना यांनी अर्जात नमूद केले नुसार अर्जदाराचे अपत्य नामे शुभम ज्ञानेश्वर थावरे जन्मदिनांक ३०/१०/२००५ रोजी मौजे वैजोडे ता.परतुर जिल्हा जालना येथे झालेला आहे त्यांच्या जन्माची नोंद नगर परिषद/ ग्रामपंचायत कार्यालय येथे घेऊन तसेच जन्म प्रमाणपत्र द्यावे यासाठी या न्यायालयात अर्ज केला आहे.

या जन्माच्या नोंदी बाबत कोणाचाही आक्षेप असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत उक्त न्यायालयात त्याबाबत लेखी आक्षेप सादर करावा.

पु.ता.दि.०१/०१/२०२५

आज दिनांक ०१/०१/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

**नायब तहसिलदार, परतुर जि.जालना**

# बस- मोटारसायकलच्या धडकेत बाप- लेकीचा करुण अंत

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. १९ जानेवारी**

साप चावलेल्या आपल्या पत्नीला मोटारसायकलवर डबा घेऊन उमरी ग्रामीण रुग्णालय कडे येत असलेल्या मोटर सायकलला उमरीकडुन येणाऱ्या नांदेड -धर्माबाद बसने जबर धडक दिल्याने या अपघातात चिंचाळा येथील मोटारसायक स्वार जागीच ठार झाला. मोटारसायकल वर बसलेली मुलगी गंभीर जखमी झाल्याने उपचारा दरम्यान तिचा मत्यू झाला तर मुलगा गंभीर जखमी झाल्याची घटना सायंकाळी सात वाजता कारेगाव रस्त्यावरील चिंचाळा शिवारात घटना घडली. उमरी तालुक्यातील चिचांळा बाप-लेकीवर अंत्यसंस्कार करण्यात आले.

चिचांळा येथिल रहिवाशी संभाजी विठ्ठल कंधारे वय ४५ मुलगा विकास संभाजी कंधारे वय १२ वर्ष , व मुलगी विद्या संभाजी कंधारे वय सहा वर्ष हे तिघे चिंचाळयाहुन आपल्या आजारी आईला उमरी ग्रामीण



रुग्णालयात जेवनाचा डब्बा घेऊन येत असताना समोरुन येणाऱ्या नांदेड धर्माबाद बस क्रमांक एम. एच. २० बी.एल १९८० ने जोरदार धडक दिल्याने मोटर सायकल संभाजी कधारे हे जागीच ठार झाले. तर मुलगा विकास संभाजी कंधारे मुलगी विद्या संभाजी कंधारे गंभीर जखमी झाल्याने सदर घटनेची माहिती मिळताच जखमींना उमरी ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. असता वैद्यकीय अधिकारी डॉ. एम. एम. टोम्पे यांनी जखमीनवर प्राथमिक उपचार करून जबर मार असल्याने पुढील उपचारासाठी नांदेडला पाठविण्यात आले. सदर घटनेची माहिती मिळताच उमरी पोलीस ठाण्याचे सपोनि अंकुश माने यांनी व पोलीस जमादार अब्दुल रियाज यांनी घटनास्थळी दाखल होत घटनेची माहिती घेवून संबंधीत चालकाविरुद्ध गन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलिस निरीक्षक अंकुश माने हे वरिष्टाच्या सल्यानुसार जोमाने तपास करीत आहेत .

# ग्रामपंचायत कार्यालय संगमवाडी येथे हळदी-कुंकू समारंभ



**तभा वृत्तसेवा**
**कंधार,दि. १९ जानेवारी**

दरवर्षीप्रमाणे संगमवाडी व काशीराम तांडा ग्रामपंचायत कार्यालयातर्फे दिनांक १८ जानेवारी रोजी घेण्यात आलेल्या हळदी-कुंकूवाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

हळदी-कुंकूवा मागील धारणा अशी आहे की प्रत्येक सुवासिनी ही साक्षात आदिशक्तीचे प्रतीक आहे. त्यांना हळद-कुंकू लावताना आपण त्यांच्या माध्यमातून देवीचे तत्त्व जागृत करतो. यामुळे केवळ आध्यात्मिकच नाही, तर आपल्या घरात सकारात्मक ऊर्जा देखील निर्माण होते. या सोहळ्यामध्ये सुवासिनींना वाण देणे, उखाणे, गाणी, खेळ आणि गोडधोड पदार्थांचा आनंद घेतात .

हळदी कुंकू समारंभ हा हिंदू संस्कृतीचे जपणूक करणारा समारंभ आहे. या समारंभाच्या माध्यमातून महिला एकत्र येतात, हळदी कुंकू करतात, वाण लुटतात त्यामुळे त्यांची एकमेकींशी ओळख होते आणि स्नेह वाढतो. माणूसच माणसाच्या मदतीला धावून येतो. या झालेल्या ओळखीतून महिला एकमेकींना अडचणीत मदत करून पुढे जाऊ शकतात. आपणास काही अडचण जाणवली, समस्या जाणवली तर आवाज द्या मी नक्की तुमच्या अडचणी समस्या सोडवण्याचा प्रयत्न करेल असे संगमवाडी च्या सरपंच सौ सुरेखा चक्रधर घुगे म्हणाल्या .

ग्रामपंचायत कार्यालय संगमवाडी आयोजीत 'सौभाग्याचे लेणं' हळदीकुंकू समारंभ मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले . यावेळी सरपंच सौ. सुरेखा चक्रधर घुगे ,उपसरपंच सौ अंजना कोंडीबा करेवाड , सदस्य सौ चांगुना ज्ञानोबा घुगे, सदस्य कविता उत्तम चव्हाण यांच्यासह गावातील महिलावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होत्या .

## संक्षिप्त वृत्त

### सप्तरंगी साहित्य मंडळाचे चौथे जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनाचे आयोजन

**मुदखेड-** प्रज्ञादर्शन शिक्षण संस्था मुदखेड व सप्तरंगी साहित्य मंडळ, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील रणछोडदास मंगल कार्यालय येथे दि. २७ जानेवारी रोजी सप्तरंगी साहित्य मंडळाच्या चौथ्या जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेत सप्तरंगी साहित्य मंडळानी चौथ्या जनसंवाद ग्रामिण साहित्य संमेलनच्या स्वागताध्यक्षपदी प्रविण गायकवाड यांची निवड करण्यात आली. या संमेलनाचे उद्घाटन महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री खा. अशोक चव्हाण यांच्या हस्ते होणार असून संमेलनाच्या अध्यक्षपदी सुप्रसिद्ध ज्येष्ठ साहित्यिक डॉ. जगदीश कदम यांची निवड करण्यात आली आहे. या संमेलनासाठी आ. ॲड. श्रीजया चव्हाण, माजी संमेलनाध्यक्ष कवी अनंत राऊत, पाणी चित्रपट फेम अभिनेत्री माधुरी लोकरे, आंतरराष्ट्रीय ख्यातकीर्त लावणी बालकलाकार डॉ. विद्याश्री येमचे यांच्यासह उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टे, तहसीलदार आनंद देऊळगावकर, पोलिस निरिक्षक वसंत सप्रे, नपचे मुख्य कार्यकारी अधिकारी शैलेश फडसे, गटशिक्षणाधिकारी रुस्तुम आडे, माजी गटशिक्षणाधिकारी दिलिप सुपे, ओबीसी चळवळीतील राष्ट्रीय नेते एस. जी. माचनवार यांची उपस्थिती राहणार आहे. दिवसभरात ग्रंथदिंडी, चित्र व नाणी प्रदर्शन, पुरस्कार वितरण, परिसंवाद, प्रकाशने, कथाकथन, गझलसंध्या, कविसंमेलन अशा विविध स्तरांतून साहित्य संमेलन संपन्न होणार असल्याची माहिती स्वागताध्यक्ष प्रविण गायकवाड निमंत्रक प्रा.प्रल्हाद इंगोले, सप्तरंगी साहित्य मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अनुरत्न वाघमारे, राज्याध्यक्ष नागोराव डोंगरे, कार्याध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे, जिल्हाध्यक्ष रणजित गोणारकर यांनी शासकिय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत दिली आहे.

### येरगीचे सरपंच प्रजासत्ताक दिनी जाणार दिल्लीला

**देगलूर-** नवी दिल्ली येथे प्रजासत्ताक दिना दिवशी लाल किल्ल्यात होणाऱ्या परेडमध्ये विशेष अतिथी म्हणून नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालुक्यातील चालुक्य कालीन नगरी येरगीच्या येथील सरपंच सौ.संगीता



मठवाले पाटील व त्यांचे सुपुत्र ग्रामपंचायत सदस्य,भाजपा जिल्हाउपाध्यक्ष तथा संजय गांधी निराधार योजना देगलूर चे अध्यक्ष संतोष पाटील यांना आमंत्रित करण्यात आले आहे. या संदर्भात नुकतेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पत्र प्राप्त झाले आहे.या वर्षीच्या दिल्ली येथे संपन्न होणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या परेडकरिता जिल्ह्यातून येरगी ग्रामपंचायत ची निवड झाली आहे. तर येरगीमुळे देगलूर तालुक्याला हा बहुमान प्रथमच मिळाला आहे. नवी दिल्ली येथे भारताच्या प्रजासत्ताक दिनाच्या परेडमध्ये उपस्थित राहण्यासाठी राज्यातून प्रत्येक जिल्ह्यातून ग्रामपंचायत सरपंचांची नावे (त्यांच्या कुटुंबासह) केंद्रशासनाच्या सूचनांनुसार निवड करण्यात आली आहे. या संदर्भात डॉ. प्र. सु. गांगुर्डे कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र संबंधित विभागाला प्राप्त झाले. तालुक्यातील महिला सरपंचाला प्रथमच हा बहुमान मिळाल्याने त्यांचे जिल्हा व तालुका प्रशासन,सरपंच संघटना, ग्रामसेवक संघटना,तसेच गावकरी व पंचायत समितीचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

### शासकीय चित्रकला परिक्षेत भाऊसाहेब देशमुख विद्यालयचे १०० टक्के निकाल

**मुक्रमाबाद-** प्रति वर्षाप्रमाणे कला संचालनालय मुंबई, महाराष्ट्र शासकीय एलिमेंटरी व इंटरमिजिएट ग्रेड परिक्षा घेतले जातात.मुक्रमाबाद




येथील भाऊसाहेब देशमुख विद्यालयचे मागील २५ वर्षा पासून विद्यालयाचा निकाल १०० टक्के असतो . निकालाची परंपरा याही वर्षी राखली आहे. दोनही परिक्षेचा निकाल १००% लागला आहे. एलीमेंटीला एकूण १०१ विद्यार्थी A ग्रेड ६, B ग्रेड २८,C ग्रेड ६७, विद्यार्थी पास झाले व इंटरमिजीएटला एकुण ९० विद्यार्थी बसले होते. ग्रेड ४ ,B ग्रेड १५ ,C ग्रेड ७१ विद्यार्थी पास झाले आहेत. कु. शटकार आरती व कु.बोधने अमृता इंटरमिजीएट ग्रेड मध्ये ग्रेड मध्ये पास झाले आहेत.वरिल विद्यार्थ्यांना कलाशिक्षक बनवा सर व काळे सर यांचे मार्गदर्शन लाभले.उत्तिर्ण सर्व विद्यार्थ्यांचे शाळेचे मुख्याध्यापक बी.मोरे व सचिव रामराव भोसले.व अध्यक्ष आशुतोष पाटील व सर्व शिक्षकांनी कौतुक व अभिनंदन केले आहे.

### आदमपूर ग्रामीण शेत शिवार परिसरात आंबा मोहरला

**बिलोली-** बिलोली तालुक्यातील आदमपूर परिसरातील काही भागात,शेत शिवारात किंवा बांधावर तुरळक असणाऱ्या आंब्याच्या झाडांना मागच्या कडाक्याच्या थंडीत तुडुंब मोहोर लगडलेला दिसून आला आहे. आंब्याला आलेला मोहोर पाहता यंदा गावरानी आंब्याची रसाळी चव शेतकरी तथा सर्वसामान्य नागरिकांना चाखायला मिळेल असे दिसते आहे.

# जनक्रांती वाचनालयातील वाचन संकल्प महाराष्ट्राचा अभियानाला विद्यार्थी व वाचकांचा मोठा प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**बिलोली,दि. १९ जानेवारी**

वाचन संस्कृतीचा विकासाव्हावा तसेच तरुण पिढीला प्रत्यक्ष ग्रंथ वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी शासनाच्या वतीने वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा अभिनव उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या अंतर्गत बिलोली शहरातील जनक्रांती वाचनालयाच्या वतीने आयोजित या उपक्रमात शहरातील विविध शाळेच्या विद्यार्थ्यांसह शिक्षक, पालक व वाचकांनी मोठा सहभाग नोंदवला होता.

यावेळी जिल्हा ग्रंथ अधिकारी अनिल सुर्यवंशी, वाचनालयाचे अध्यक्ष माजी आमदार गंगाधर पटने, मनोज जाधव, सिद्धार्थ पवार,जनक्रांती वाचनालयाचे ग्रंथपाल सुभाष पाटील, कलावती चौधरी, दिगंबर बिलोलीकर यांच्यासह वाचकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# भोकर सा.बां.विभागात झालेल्या विविध कामाची चौकशी करा : अमोल पवार

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १९ जानेवारी**

भोकर येथील सा.बा.विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्या मागील चार वर्षाच्या कार्यकाळात अनेक बोगस कामे झाली असून आपल्या मर्जितल्या गूत्तेदारांना हाताशी धरुन इंटरनल टेन्डर प्रक्रियेत मॅनेज करुन बोगस पध्दतीने अत्यंत हलक्या दर्जाची कामे करण्यात आली२०२१-२०२४ या कार्यकाळात झालेल्या विविध कामाची चौकशी करण्याची मागणी शिवसेनेचे भोकर तालूका प्रमूख अमोल धनराज पवार यांनी राज्याचे मूख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद केले की,मागील चार वर्षाच्या कार्यकाळात भोकर सार्वजनिक विभागात कूठल्याही शासन नियमाचे पालन न करता सि.सि.रोड बांधकाम ड्रेनेज बांधकाम खड्डे बूजविणे हि कामे अंदाजपत्रकानूसार कामे न करता थातूर मातूर कामे करण्यात आली व बिले उचलण्यात आले दहा लाखाच्या आतील अनेक कामे कागदोपत्री दाखवून प्रत्यक्ष कोणतेही काम न करता बिले मंजूर करुन ती उचलण्यात आल्याचे नमूद करण्यात आले सर्व कामात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे निवेदनात नमूद केले आहे. अधिकारी व गूत्तेदार यांच्या सहमतीने शासनाच्या कोट्यावधी चा निधीची विल्हेवाट लावण्यात आली सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी याकडे लक्ष घालून झालेल्या सर्व कामाची उच्चस्तरीय चौकशी करुन संबधित गूत्तेदारांचे नाव काळ्या यादीत टाकण्यात यावे भोकर सा.बां.वि.चे कार्यकारी अभियंता चार वर्षापासून एकाच ठिकाणी ठाण मांडून बसल्याने मर्जीतील गूत्तेदारांना हाताशी धरुन बोगस कामे करण्यात आली दरम्यानच्या कार्यकाळात सा.बां.वि.भोकर मध्ये किती कामे करण्यात आली व ती किती रक्कमेची होती याची चौकशी व्हावी व कामाचा दर्जा तपासण्यात यावा चार वर्ष एकाच ठिकाणी कार्यकारी अभियंता कसे राहू शकतात याची देखील चौकशी करण्याची मागणी शिवसेनेचे भोकर तालूका प्रमूख अमोल धनराज पवार यांनी राज्याचे मूख्यमंत्री देवेंद्र फडणविस उपमूख्यमंत्री एकनाथराव शिंदे बांधकाम मंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# सेवानिवृत्त शिक्षकाचे थकित वेतनाचे हप्ते तात्काळ मिळणार

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव,दि. १९ जानेवारी**

नायगांव पंचायत समितीच्या प्रांगणात सेवानिवृत्त शिक्षकांनी सातव्या वेतन आयोगातील तिस-या व चौथा हाप्त्याचे बजेट असून.चिरीमिरीच्या लालसपोटी बिल देयके काढण्यासाठी टाळाटाळीच्या विरोधात आमरण उपोषणाची हत्यार उपसले होते.ही बातमी दैनिक तरुण भारत वृतपत्रात प्रकाशित होताच गट विकास अधिकारी लक्ष्मण वाजे नी थकित बिलदेयके काढण्याच्या कार्यवाहीला तात्काळ सुरुवात केली अशी माहिती उपोषणकर्ते अशोक पवळे व गंगाधर प्रभू देशमुख यांनी दिली.

तालुक्यातील नरसी येथील सेवानिवृत्त शिक्षक तथा गट शिक्षणाधिकारी अशोक गंगाधर पवळे व सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी प्रभू गंगाधर देशमुख यांचे वर्षभरापासून थकलेल्या सातव्या वेतन आयोगाच्या तिसऱ्या व चौथ्या हप्त्याच्या व देयकाची दैनिक तरुण च्या माध्यमातून नायगाव पंचायत समितीच्या अजब कारभारा बद्द्ल दि.१५ जानेवारी रोजी बातमी प्रकाशित झाली होती.

त्या अनुषंगाने थकीत वेतन धारक अशोक पवळे व प्रभू देशमुख यांनी नायगांव पंचायत समितीच्या प्रांगणात टेन्ट टाकून.पंचयत समितीचे गट विकास अधिकारी लक्ष्मण वाजे यांच्या कारभाराच्या विरोधात आमरण उपोषणा आंदोलनाचे हत्यार उपसले होते.त्यात पहिल्याच दिवशी दैनिक तरुण भारत या वृत्तपत्रांत प्रकाशित होताच.त्या दरम्यान संबंधित विभागाने तात्काळ आता महिन्यात थकित वेतनाचे हप्ते जमा करणार असल्याचे


पंचायत समिती समोर सेवानिवृत्त कर्मचार्‍यांचे आमरण उपोषण

आश्वासन दिले आहे. मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प. नांदेड यांचे पत्रानुसार ३१ मार्च २०२४ रोजी सातव्या वेतन आयोगाचा तिसरा व चौथा हप्ता तसेच देशमुख जी.पी सेवानिवृत्त मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प. नांदेड यांचे पत्रान्वये ३१ मार्च २०२४ रोजी आपल्या सातव्या वेतन आयोगाचा तिसरा व चौथा हप्ता तसेच देशमुख जी.पी. सेवानिवृत्त (शि.वि.अ.) यांचे वित्त प्रेषण या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

सदर देयके पारित करण्यासाठी प्रणालीद्वारे अग्रेषित करणे अडचणीमुळे सदर देयक प्रणालीवर लेखाशीर्ष देयक ऑनलाईन ऑनलाईन करता आले नाही. त्यामुळे सदर निधी अखर्चित असल्याने व्यपगत झाला आहे. यांचे वित्त प्रेषण या कार्यालयास प्राप्त झाले होते. सदर देयके पारित करण्यासाठी प्रणालीद्वारे अग्रेषित करणे अनिवार्य होते.परंतू तांत्रिक अडचणीमुळे सदर देयक, लेखाशीर्षवर देयक ऑन लाईन करता आले नाही. त्यामुळे सदर निधी अखर्चित असल्याने व्यपगत झाल्याची ही कबुली दिली आहे.आपल्या मागणीच्या अनुषंगाने पुनश्चय सदर देयकासाठी बेमुदत उपोषण करण्याचा इशारा सातव्या वेतन आयोगाचे हप्ते देण्यास वर्षभरा पासून टाळटाळी च्या विरोधात नायगांव पंचायत समिती च्या प्रांगणात आमरण उपोषणाचा तंबू लागताच गटशिक्षणाधिकारी ,मार्केटकमिटीचे सभापती श्रीनिवास चव्हाण यांच्या मध्यास्थिने महिन्याच्या आत थकीत वेतनाची हप्ते वेतनासाठी लागणाऱ्या पाठ पुराव्यासह जमा करण्याचे लेखी आश्वासन दिल्याने उपोषण तूर्तास मागे घेण्यात आले.

# लोहा येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस वीर माधवराव नळगे यांचे नाव

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, दि. १९ जानेवारी**

राज्याच्या कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने राज्यातील शासकीय १३२ औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) चे शासनस्तरावरून नुकतेच नामकरण करण्यात आले आहे. त्यामध्ये लोहा शहरातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नाव स्वातंत्र्य सेनानी वीर माधवराव नळगे असे करण्यात आले आहे.



लोहा येथे मागील अनेक वर्षांपासून प्रारंभी भाड्याच्या जागेत तर मागील दोन ते तीन वर्षांपासून स्वतःच्या जागेत शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची इमारत उभी आहे. सदरील आय. टी.आय चे नामकरण करण्याचे राज्य सरकारने यापूर्वीच जाहीर केले होते. त्यानुसार राज्यातील १३२ आयटीआय नविन नावे घोषित करण्यात आले आहे. त्यामध्ये लोहा शहरातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) चे नाव वीर माधवराव नळगे असे करण्यात आले आहे.

भारत देश इंग्रजांच्या पारतंत्र्यातून मुक्त झाला परंतु मराठवाडा हा निजामी राजवटीत होता. मराठवाड्याला निजामी राजवटीतून स्वातंत्र्य करण्यासाठी लोहा शहरातील तत्कालीन स्वातंत्र्य सेनानी वीर माधवराव नळगे यांनी सहकरी स्वातंत्र्य सैनिकासोबत निजामाशी अनेक काळ संघर्ष करून मराठवाड्याला जुलमी निजामी राजवटीतून स्वातंत्र्य केले. त्यांचे नाव इतिहासात अजरामर झाले. त्यांच्या वीर पराक्रमाची यशोगाथा स्मरणात राहावी या उद्देशाने राज्य सरकारकडून लोहा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस (आयटीआय) यास वीर माधवराव नळगे यांचे नाव जाहीर केले. त्या बद्दल लोहा शहरातील अनेकांनी आनंद व्यक्त केला.

आजघडीला सदरील आयटीआय मध्ये एकूण सहा ट्रेड होते मात्र यापूर्वीच दोन ट्रेड बंद पडले आहेत. सध्या आयटीआय मध्ये चार ट्रेड कोर्स सुरू आहेत. त्यामध्ये यांत्रिकी डिझेल मेकॅनिक, वेल्डर, फिटर आणि ईलेक्ट्रिशियन असे चार कोर्स आहेत. तर एकूण १४० विद्यार्थी संख्या आहे. संस्थेत प्राचार्य सह नऊ कर्मचारी कर्तव्यावर आहेत. नवीन ट्रेड वाढवून घेण्यासाठी तसा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे संस्थेकडून पाठविण्यात आल्याची माहिती आयटीआय संस्थेतील कर्मचाऱ्यांकडून देण्यात आली.

# बंद असलेल्या किनवट एमआयडीसीमध्ये उद्योग-धंदे आणावेत

## उद्योग राज्यमंत्री इंद्रनिल नाईक यांना भाजपा जिल्हा उपाध्यक्ष ॲड. अविनाश राठोड यांचे निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**माहुर,दि. १९ जानेवारी**

किनवट/ माहूर विधानसभा-८३ क्षेत्रात दोन्ही तालुक्यातील बेरोजगार युवकांना तालुक्यातच रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी बंद असलेल्या किनवट एमआयडीसीत

उद्योग-धंदे आणण्यासाठी आपण आपल्या परीने स्वतः लक्ष घालून प्रयत्न करावेत यासाठी आज गुरुवार दिनांक १६ रोजी भाजपाचे नांदेड जिल्हा उपाध्यक्ष ड.अविनाश गोविंद राठोड यांनी उद्योग राज्यमंत्री इंद्रनिल नाईक यांची मुंबई येथे प्रत्यक्ष भेट भेटून लेखी निवेदन दिले.समाधानाची बाब म्हणजे मंत्री नाईक यांनीही या मागणीसंदर्भात स्वतः लक्ष घालण्याची हमी देऊन लवकरच उचित उपाययोजना आखण्याचे आश्वासन दिले.

ॲड.अविनाश राठोड हे मुळ माहूर तालुक्यातील तर उद्योग राज्यमंत्री इंद्रनिल



नाईक हे किनवट,माहूर लगतच्या पुसदचे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे आमदार नुकतीच मंत्री इंद्रनिल नाईक यांचा किनवट तालुक्यातील दहेली तांडा येथे दिवंगत माजी आमदार प्रदीप नाईक यांच्या कुटुंबीयांची सांत्वन भेट घेण्यासाठी दौरा झाला होता. माहूर किनवट तालुक्यातील औद्योगिक मागासलेपणाची त्यांना चांगल्याप्रकारे जाण आहे.याच अनुषंगाने भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष ड.राठोड यांनी मंत्री नाईक यांची मुंबई येथे आज १६ रोजी भेट घेऊन येथील रोजगाराच्या अभावाविषयी अवगत करून दोन्ही तालुक्यातील बेरोजगार तरुणांसाठी याठिकाणी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी उद्योग धंद्यांची निर्मिती करण्यावर चर्चा केली.

किनवट माहूर विधानसभा क्षेत्र हे बंजारा आदिवासी बहुल मतदार संघ असून महाराष्ट्राच्या एका कोपऱ्यात असल्यामुळे व दूरदृष्टिहीन नेतृत्वामुळे विकासापासून वंचित राहीलेला आहे. किनवट तालुक्यातील एम आय डी सी मध्ये पायाभूत सुविधांचा विकास झालेला असूनही मात्र अद्ययावत असे कुठलेही उ्द्योग याठिकाणी अद्यापही सुरू झालेले नाहीत.ही येथील आदिवासी व बंजारा बहुल तालुक्यातील मागासलेल्या नागरीकांच्या दृष्टीने फार मोठी शोकांतिका असल्याचे निवेदनात नमूद केले आहे.

किनवट - माहूर तालुक्यात मोठ्या प्रमाणात निसर्गनिर्मित संसाधने उपलब्ध आहेत. या भागात मोठ्या प्रमाणात शिक्षित तरुण वर्ग सुशिक्षित बेकार आहे, मोल मजूरी करणारा वर्ग कामा-अभावी लगतच्या तेलंगाणा राज्यात जातो. तसेच किनवट एम आय डी सी हे येथील रेल्वे स्टेशन मुळे महाराष्ट्रातील मोठ्या शहरांशी जोडलेला असून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रयत्नाने साकार झालेला समृद्धी महामार्गही अगदी जवळ आहे. किनवट तालुक्याला तेलंगाणा मधील आदिलाबाद हि मोठी बाजारपेठ अगदी लागून आहे. या सर्व बाबींचा विचार केला तर किनवट एम आय डी सी मध्ये उ्द्योग-धंद्यासाठी अत्यंत पोषक वातावरण आहे.

त्यामुळे किनवट - माहूरच्या तरुणांना रोजगाराची संधि तालुक्यातच उपलब्ध होण्यासाठी आपल्या मार्फत किनवट एम आय डी सी मध्ये राज्य शासनाच्या मदतीने उ्द्योग धंदे आणण्यास प्रशासनाने अग्रेसर भूमिका घेत योग्य उपाययोजना करण्याचे आदेश देऊन या संदर्भात आपल्या दालनात प्रशासनाची बैठक बोलावण्यात यावी अशी नम्र विनंती करत आपल्या मागणीचे निवेदन भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष ड अविनाश राठोड यांनी उद्योग राज्यमंत्री इंद्रनिल नाईक यांना दिले आहे.या मागणीसंदर्भात लवकरच बैठक बोलावण्यात येईल असे आश्वासन मंत्री नाईक यांनी दिले असल्याने मंत्री इंद्रनिल नाईक यांचे किनवट- माहूरच्या जनतेच्या वतीने ॲड. अविनाश राठोड यांनी आभार व्यक्त करत उद्योग राज्यमंत्री इंद्रनिल नाईक यांना माहूर गडावरील श्री रेणुकादेवी चे दर्शन घेण्यासाठी यावे असे निमंत्रण यावेळी दिले.